POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१८२ ● मुंबई, मंगळवार, ०३ फेब्रुवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## समान नाही, तर किमान द्या!

### मुंबई महापौरपदाबाबत शिवसेनेची भाजपकडे मागणी, सत्तावाटपाचा फॉर्म्युला काय?

**■बातमी /लेख, विनोद दशगथ मेढे**

मुंबई महापालिका निवडणुकीत एकत्र लढलेल्या शिवसेना-भाजपला बहुमत मिळाल्यानंतर दोन्ही पक्ष एकत्र येऊन महायुतीचा गट स्थापन करण्याच्या तयारीत आहेत. या गटाचे नेते म्हणून भाजपचे गणेश खणकर आणि प्रभाकर शिंदे यांची नावे चर्चेत आहेत. शिवसेनेने समसमान अडीच वर्ष नाही, तर किमान सव्वा वर्षांसाठी मुंबईचे महापौरपद द्यावे अशी मागणी केली आहे. सत्तावाटपाचा प्रस्ताव भाजपने मान्य केल्यास शिवसेना ही महायुतीचा संयुक्त गट स्थापन करण्यास तयार होईल, असे सेना पदाधिकाऱ्यांनी सांगितले. यावर अंतिम निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेच घेतील.

भाजप आणि शिवसेना एकत्र येऊन एक मोठा गट तयार करणार आहेत. या गटाचे नेतृत्व कोण करणार यावर चर्चा सुरू आहे. भाजपचे गणेश खणकर आणि प्रभाकर शिंदे हे दोघेही या पदासाठी प्रबळ दावेदार मानले जातात. गणेश खणकर हे बोरिवलीचे भाजप नगरसेवक आहेत. ते भाजपचे जुने नेते आहेत. प्रभाकर शिंदे हे मुलुंडमधून भाजपचे ज्येष्ठ नगरसेवक आहेत.

विशेष म्हणजे, प्रभाकर शिंदे हे आधी शिवसेनेत होते आणि २०१७ मध्ये भाजपमध्ये सामील झाले. मुंबई महापालिकेचा कार्यकाळ २०२२ मध्ये संपला तेव्हा तेच भाजपचे गट नेते होते. ते स्थायी समितीचे सदस्यही होते. जर गणेश खणकर यांना भाजपचे गटनेते झाले, तर प्रभाकर शिंदे हे स्थायी समितीच्या अध्यक्षपदासाठी प्रबळ दावेदार ठरतील. गटनेत्याचे पद ५ वर्षांसाठी असते. पण स्थायी समितीच्या अध्यक्षांची निवड दरवर्षी होते आणि त्यांचा कार्यकाळ फक्त १ वर्षाचा असतो.

एका वरिष्ठ भाजप नेत्याने सांगितले की, "पक्षाला गट नेते म्हणून मूळ भाजपचा कार्यकर्ता हवा आहे. तसेच तो मराठी असावा. गणेश खणकर या दोन्ही निकषांमध्ये बसतात. प्रभाकर शिंदे हे मूळचे शिवसेनेचे असले तरी ते खूप अनुभवी आहेत. त्यामुळे ते स्थायी समितीसारखे महत्त्वाचे पद सांभाळण्यासाठी अधिक योग्य ठरतील."



या दोन्ही पक्षांमध्ये सत्ता वाटपाचा एक फॉम्युर्ला ठरला आहे. त्यानुसार भाजपचा नगरसेवक गट नेता असेल. पण ११८ नगरसेवकांच्या या संयुक्त गटाचा व्हिप (मुख्य प्रतोद) शिवसेनेचा असेल. याचा अर्थ, शिवसेनेला गट नेते पद मिळाले नाही तरी, व्हिपच्या माध्यमातून त्यांना संयुक्त गटावर नियंत्रण ठेवता येईल. या सत्ता वाटपानुसार, भाजपला महापौर पद आणि स्थायी समितीचे अध्यक्षपद मिळण्याची शक्यता आहे. तर शिवसेनेला सुधारणा समिती, आरोग्य समिती आणि बेस्ट समितीचे अध्यक्षपद तसेच उपमहापौर पद मिळू शकते. शिवसेनेचे नगरसेवक अमेय घोले हे शिवसेनेचे व्हिप म्हणून काम पाहू शकतात. मुंबई महापालिकेमध्ये संयुक्त गट स्थापन करण्याबाबतचा अंतिम निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात होईल. मात्र सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, संयुक्त गट स्थापन करण्याचा मार्ग जवळपास मोकळा झाला आहे.

## मुंबईचा महापौर ११ फेब्रुवारीला ठरणार

**■मुंबई। प्रतिनिधी,**

गेल्या काही दिवसांपासून राज्यात महानगरपालिका निवडणुकीची सगळीकडे चर्चा होती. या निवडणुकीत राज्यभरात एकूण २९ महापालिकांसाठी निवडणूक झाली होती. या सर्व महापालिकांपैकी मुंबईची महानगरपालिका चर्चेच्या केंद्रस्थानी होती. कारण या पालिकेवर सत्ता मिळवण्यासाठी सर्वच पक्षांनी जोर लावला होता. मनसेचे प्रमुख राज ठाकरे आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे दोन्ही दिग्गज नेते एकत्र आले होते. गेल्या अनेक वर्षांपासून दोन्ही भावांनी एकत्र यावे, अशी इच्छा व्यक्त केली जात होती. मुंबई पालिकेच्या निवडणुकीमुळे या दोन्ही भावांच्या युतीची ऐतिहासिक घटना घडली. परंतु या निवडणुकीत महायुतीने बाजी मारली असून भाजपा हा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. असे असतानाच आता मुंबईच्या महापौरपदी नेमकं कोण बसणार? याची सर्वांनाच उत्सुकता लागली




होती. ही उत्सुकता आता संपलेली आहे. कारण येत्या ११ फेब्रुवारी रोजी मुंबईकरांना त्यांचा नवा महापौर मिळणार आहे.

**११ तारखेला मतदान होणार**

मिळालेल्या माहितीनुसार मुंबईच्या नव्या महापौराच्या निवडीसाठी येत्या ११ फेब्रुवारी रोजी मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे. त्यासाठी सर्व प्रशासकीय तयारी करण्यात येत आहे. या निवडीसाठी येत्या ६ फेब्रुवारी रोजीपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात होईल. उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर ११ फेब्रुवारी रोजी मतदान होईल. त्यानंतर महापौर कोण होणार हे स्पष्ट होईल.

**महापौरपदासाठी नेमकी कोणाची निवड?**

गेल्या काही दिवसांपासून मुंबईच्या महापौरपदासाठी महायुतीत बराच खल चालू होता. निवडणुकीचा निकाल लागताच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपले सर्व नगरसेवक पंचतारांकित हॉटेलमध्ये हालवले होते. घोडेबाजार टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला होता. एकनाथ शिंदे यांनी आपल्याच पक्षाला मुंबईचे महापौरपद मिळावे यासाठी बरेच प्रयत्न केले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दावोस दौऱ्यावर असल्यामुळे महापौरपदाच्या निवडीची चर्चा रखडली होती. आता फडणवीस परतले असल्याने शिंदे गट आणि भाजपा यांच्यात चर्चा झाली आहे. त्यामुळे आता लवकरच मुंबईला महापौर मिळणार आहे.

## “सुरक्षित प्रवास, जबाबदार नागरिक” वसईत रस्ता सुरक्षा जनजागृती अभियान



**■वसई। प्रतिनिधी,**

वसई वाहतुक शाखेकडुन रस्ता सुरक्षा विषयी जनजागृती अभियान व मार्गदर्शक सत्राचे आयोजन. अधिक माहितीनुसार महाराष्ट्र शासनाच्या निदेर्शानुसार तसेच रस्ता सुरक्षा महीना जानेवारी २०२६ च्या अनुशंगाने महाराष्ट्र पोलीस दल मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत, वसई वाहतुक नियंत्रण शाखा, वसई यांच्या वतीने दिनांक ३१/०१/२०२६ रोजी रस्ता सुरक्षा विषयी जनजागृती अभियान व मार्गदर्शक सत्राचे आयोजन करण्यात आले.सदर कार्यक्रमाचा मुख्य उद्देश रस्ता अपघातांचे प्रमाण कमी करणे, नागरिकांमध्ये विशेषतः तरुण च विद्यार्थी वर्गामध्ये वाहतुक नियमांनविषयी जागरुकता निर्मान करणे, तसेच सुरक्षित वाहन चालविण्याच्या सवयी रुजविणे हा होता. कार्यक्रमात रस्ता सुरक्षेशी निगडीत विविध महत्वांच्या बाबींवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाची सुरुवात श्रीमती एंझा डायस (लेक्चरल ह्युमीनीटी ॲन्ड सायन्य) यांच्या प्रस्तावनेने झाली. त्यांनी रस्ता सुरक्षेचे महत्व अधोरेखित करत उपस्थित विद्यार्थ्यांना कार्यक्रमात सक्रीय सहभाग घेण्याचे आवाहान केले. मार्गदर्शक सत्रात डॉ. रिता साचला, राधे फाउंडेशनचे प्रमुख यांनी आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची काळजी, रस्ता अपघात झाल्यास १०८ व १२२ या आपत्कालीन हेल्पलाईन क्रमांकावर तात्काळ संपर्क कसा साधावा, कॉल करताना कोणती माहीती दयावी. अपघातग्रस्त व्यक्तीस सुरक्षितरीत्या कशी मदत करावी, तसेच जखमी व्यक्तीस वेळेत रुग्णालयात पोहचविण्याचे महत्व याबाबत संविस्तर व प्रात्यक्षिक स्वरुपात मार्गदर्शन केले.

तसेच पोलीस उप निरीक्षक/मेहबूब तडवी यांनी विद्यर्थ्यांना संबोधित करताना, रस्ता अपघांताची प्रमुख कारणे, वेग मयार्दा पाळण्याचे महत्व, दुचाकी स्वार यांनी हेल्मेट वापरणे, चारचाकी वाहन चालकांनी सीट बेल्टचा वापर करणे, मद्यपान करुन वाहन चालविण्याचे दुष्परिनाम, तसेच वाहतुक नियमांचे उल्लंघन केल्यास होणाया कायदेशिर कारवाई बाबत सविस्तर माहीती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना जवाबदार नागरिक म्हणुन वाहतुक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमास श्री. एन. के कव्हाले (प्रिन्सीपल), श्री. अनुराग राठोड (लेक्चरल ए.आय डिपार्टमेंट), श्री. एस. व्ही. गोसावी (एच ओ डी. सिव्हील),श्री. के.ए मोकाशी (लेक्चरल कम्प्युटर डिपार्टमेंट), श्रीमती एंझा डायस (लेक्चरल ह्युमीनीटी आणि सायन्य), पोउपनि/मेहबुब तडवी, पोशि/ भिमराज घोरपडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

सदर जनजागृती कार्यक्रमास एकूण ६०० ते ६५० विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी वर्ग यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी वाहतुक नियमाचे पालन करण्याचा व रस्ता सुरक्षेचा प्रचार करण्याचा संकल्प केला. रस्ता सुरक्षा महीना जानेवारी २०२६ अंतर्गत आयोजन करण्यात आलेले हे जनजागृती अभियान अत्यंत यशस्वीपणे पार पडले असून, रस्ता अपघात रोखण्यासाठी जनजागृती व नियमांचे पालन हाच सर्वोत्तम उपाय आहे. असा ठाम संदेश या कार्यक्रमातुन देण्यात आला आहे.

### वसई-विरारमध्ये महापौर-उपमहापौरपदासाठी चुरस

## महापौरपदासाठी बविआचे ३, भाजपचा १ उमेदवार रिंगणात



वसई-विरार महानगरपालिका निवडणुकीत एकूण ११५ पैकी ६६ जागा जिंकून बहुजन विकास आघाडी हा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. ही निवडणूक बविआने काँग्रेस आणि मनसे यांना सोबत घेऊन संयुक्त आघाडी म्हणून लढवली होती. त्यामध्ये काँग्रेसला ४ तर मनसेला १ जागा मिळाली. अशा प्रकारे बविआ आणि मित्रपक्षांना मिळून एकूण ७१ जागा मिळाल्या आहेत. दुसरीकडे, भाजपला ४३ जागा मिळाल्या असून त्यांच्या मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेला १ जागा मिळाली आहे. त्यामुळे महायुतीकडे एकूण ४४ जागा आहेत.

**■वसई। प्रतिनिधी,**

वसई-विरार शहर मनपाच्या महापौरपदासाठी बहुजन विकास आघाडीच्या (बविआ) तीन नगरसेवकांनी तर भाजपच्या एका नगरसेवकाने नामनिर्देशनपत्र दाखल केले आहे. उप-महापौरपदाच्या निवडणुकीसाठी बविआकडून दोन आणि भाजपकडून एका नगरसेवकाने अर्ज सादर केला आहे. महापौर व उपमहापौरपदाची निवड करण्यासाठी वसई-विरार शहर महानगरपालिकेची विशेष बैठक मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी रोजी दुपारी १.०० वाजता महानगरपालिका मुख्यालयातील सर्वसाधारण सभागृह, ४ था मजला, यशवंत नगर, विरार (प.) येथे होणार आहे.

महापौर व उपमहापौरपदाच्या निवडणुकीसाठी उमेदवारांनी ३० जानेवारी रोजी नामनिर्देशनपत्र सादर केली. बविआच्या वतीने महापौरपदासाठी अजीव यशवंत पाटील, प्रफुल्ल जगन्नाथ साने आणि निशाद अरुण चोरघे यांनी अर्ज दाखल केले आहेत. तर भाजपच्या वतीने ॲड. दर्शना त्रिपाठी-कोटक यांनी उमेदवारी अर्ज सादर केला आहे. उपमहापौर पदासाठी बविआकडून मार्शल डॉमनिक लोपीस आणि कन्हैया (बेटा) मनोहर भोईर यांनी अर्ज दाखल केले आहेत. तर भाजपकडून नारायण सुरेश मांजरेकर यांनी उमेदवारी अर्ज सादर केला आहे.

३ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या विशेष बैठकीत नामनिर्देशनपत्रांची छाननी, वैध उमेदवारांची यादी जाहीर करणे, नामनिर्देशन मागे घेण्याची प्रक्रिया, अंतिम उमेदवारांची घोषणा आणि आवश्यकता भासल्यास हात वर करून मतदान या सर्व प्रक्रिया पार पाडल्या जाणार आहेत. मतदानानंतर उमेदवारांना समान मते मिळाल्यास चिठ्ठीद्वारे सोडत काढून निकाल निश्चित केला जाईल. निवडून आलेल्या महापौर व उपमहापौर यांची नावे पीठासीन अधिकाऱ्यांमार्फत अधिकृतरीत्या जाहीर केली जातील, अशी माहिती महानगरपालिकेकडून देण्यात आली आहे.

### मुंबई विद्यापीठाच्या परीक्षांच्या तारखेत बदल

## आता ‘या’ तारखांना होणार परीक्षा




**म्हणून परीक्षेच्या तारखेत बदल झाला**

खरंतर या निवडणुकांसाठी येत्या ५ फेब्रुवारीला मतदान होऊन ७ तारखेला मतमोजणी करण्यात येणार होती. तसेच त्याच दिवशी निकालही लागला असता. मात्र २८ जानेवारी रोजी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार याचे अपघाती निधन झाले. त्या दिवशी जाहीर करण्यात आलेल्या शासकीय दुखवट्यामुळे सर्व सार्वजनिक कार्यक्रम आणि परीक्षा रद्द करण्यात आल्या होत्या. त्यानंतर निवडणुकांचा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यात सध्या सर्वत्र जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीचे वारे वाहत आहेत. याच पार्श्वभूमीवर मुंबई विद्यापीठाने एक महत्वाचा निर्णय घेतला आहे. त्या निर्णयानुसार फेब्रुवारीच्या ९ आणि १० तारखेला होणाऱ्या परीक्षा आता पुढे ढकलण्यात आल्या आहेत. विद्यापीठातर्फे सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आलं असून त्यानुसार आता ९ आणि १० तारखेला होणाऱ्या परीक्षा फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात घेण्यात येणार आहेत. जिल्हा परिषदेच्या निवडणुका आणि माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे विद्यापीठाने हा निर्णय घेतला आहे.

**परीक्षेच्या स्वरूपात कुठलाही बदल नाही**

मुंबई विद्यापीठाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, जे पेपर ९ आणि १० तारखेला होणार होते ते आता २४ आणि २५ फेब्रुवारी रोजी घेण्यात येतील.परीक्षेची तारीख जरी बदलण्यात आली असली तरी परीक्षेच्या स्वरूपात कुठलाही बदल नसणार आहे. त्यामुळे आधीच्या वेळापत्रकात जी वेळ दिली होती, त्या वेळेनुसारच २४ आणि २५ तारखेला या परीक्षा होतील. सर्व संबंधित महाविद्यालयांनी या सुधारित वेळापत्रकाची माहिती तातडीने विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावी असे निर्देश देखील विद्यापीठाने दिले आहेत.

## कोंडाईबारी घाटात लालपरीचा भीषण अपघात, दोन कंटेनरमध्ये बसचा चुराडा

**■नंदुरबार। प्रतिनिधी,**

नवापूर तालुक्यातील कोंडाईबारी घाटात आज एका भीषण अपघाताने परिसरात खळबळ उडाली. विसरवाडी पोलीस चौकी परिसरात प्रवाशांच्या सोयीसाठी उभी असलेल्या नवापूर आगाराच्या एसटी बसला एका सुसाट कंटेनरने मागून जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, बसमधील चालक आणि वाहकासह एकूण १५ प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. अपघाताचे दृश्य पाहून उपस्थितांच्या अंगावर शहारे आले, मात्र सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. जखमींना तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे घाटातील वाहतूक सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

सुरत-धुळे महामार्गावर १ फेब्रुवारी रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास एक थरारक अपघात घडला. नवापूर आगाराची पुणे-नवापूर बस (एमएच १४ बीटी १९५७) महामार्गावर उभी असताना, मागून येणाऱ्या एका भरधाव कंटेनरने तिला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, बस समोर असलेल्या ट्रक आणि मागचा कंटेनर यांच्यामध्ये अक्षरशः चिरडली गेली. समोरच्या ट्रकचा लोखंडी अँगल बसच्या केबिनमध्ये घुसल्याने बसच्या पुढच्या भागाचा पूर्णपणे चक्काचूर झाला आहे. या अपघातात बस चालक महेंद्र लाजा गावित हे केबिनमध्ये अडकून पडले होते, तर वाहक संतोष बारसू सोंडे यांच्या डोक्याला व पायाला गंभीर दुखापत झाली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली आणि मोठ्या प्रयत्नांनंतर चालकाला केबिनमधून सुखरूप बाहेर काढले. जखमींवर सध्या उपचार सुरू असून, या अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.



**१५ प्रवाशांचा जीव...**

जामनपाडा येथील मनोहर जयवंत गावित यांनी दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे जखमींना वेळेवर उपचार मिळणे शक्य झाले. त्यांनी माणुसकीचे दर्शन घडवत आपल्या खाजगी वाहनातून गंभीर जखमींना तातडीने विसरवाडी ग्रामीण रुग्णालयात हलवले. बसमध्ये एकूण १५ प्रवासी होते, ज्यात नवापूर, साक्री, सुरत आणि सटाणा येथील नागरिकांचा समावेश होता. सुदैवाने, या भीषण अपघातात बहुतांश प्रवासी किरकोळ जखमी झाले असून त्यांच्यावर प्राथमिक उपचार सुरू आहेत. अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती, मात्र विसरवाडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नरेंद्र साबळे यांनी पथकासह तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य राबवले. आपत्कालीन सेवांच्या मदतीने वाहतूक पूर्ववत करण्यात आली असून, पोलीस या घटनेचा सखोल तपास करत आहेत.

## अजितदादांच्या अंत्यसंस्कारादरम्यान २० लाख रुपयांचे दागिने चोरीला... बारामती पोलिसांनी आवळल्या मुसक्या

**आरोपींची नाव समोर**

या प्रकरणी तपासादरम्यान, आरोपी राजकुमार बाबुराव आठवले, मोहम्मद अनीस मोहम्मद युनूस, मोहम्मद सादिक मोहम्मद गफारस, मोहम्मद सादिक, दत्तात्रय बबन धोत्रे, नितीन अंकुश गायकवाड यांना अटक करण्यात आली. चोरांनी चोरलेले सोने आणि रोख रक्कम जप्त करण्यासाठी आरोपींची कसून चौकशी सुरु केली जात आहे.



**■बारामती। प्रतिनिधी,**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी बारामतीत विमान अपघातात निधन झाले. या निधनानंतर २९ जानेवारी रोजी त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी बारामतीमध्ये राज्यातील अनेक राजकीय नेत्यांसह सर्व जनसमुदाय लोटला होता. याच गदीर्चा फायदा घेत काही चोरट्यांनी घटनास्थळी उपस्थित असलेल्या नागरिकांच्या गळ्यातील सोन्याच्या साखळ्या आणि रोख रक्कम चोरून नेल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. तब्बल २०.५० लाख सोन्यांची चोरी करण्यात आल्याचं वृत्त आहे.

तक्रारदारांनी बारामती तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. तपासादरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार, तक्रारदार रणजित बाळासाहेब जाधव यांच्यासह विश्वजीत अनिल तुपे, अंकुश शांताराम दिघे, प्रशांत लक्ष्मण सपकाळ, विकास कैलाश भागवत, रणजित मधुकर भोसले आणि इतरांचे मिळून सुमारे २० लाख रुपये सोन्याच्या साखळ्या, रोख रक्कम आणि इतर मौल्यवान वस्तू चोरीला गेल्याचं वृत्त आहे. या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस तांत्रिक आणि गोपनीय माहितीच्या आधारे पुढील तपास करत आहेत.



# संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## लोककेंद्रित अर्थसंकल्प!



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी भारताचा अर्थसंकल्प सादर केला. अर्थमंत्री म्हणून सलग नवव्यांदा अर्थसंकल्प सादर करण्याचा ऐतिहासिक विक्रम त्यांनी प्रस्थापित केला. विशेष म्हणजे २६ वर्षांनंतर प्रथमच अर्थसंकल्प रविवारी मांडण्यात आला. यंदाच्या अर्थसंकल्पात मध्यमवर्ग, शेतकरी आणि तरुण यांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे पायाभूत सुविधांच्या विकासासाठी सरकारने १२.२ लाख कोटी रुपयांचे विक्रमी प्रावधान (तरतूद) करून भविष्यात सुविधा आणि रोजगारनिर्मिती करण्याची योजना घोषित केली आहे. सरकारने 'आत्मनिर्भर भारत' या त्याच्या घोषणेचा पुनरुच्चार या अर्थसंकल्पात करत त्यासाठी आवश्यक ते प्रावधान केले आहे. अर्थसंकल्पात काय घोषणा होणार? आपल्या पदरात काय पडणार? याची उत्सुकता विशेष करून उद्योजकवर्ग, शेतकरी आणि सामान्यजन यांना होती. १ एप्रिलपासून नवा 'प्राप्तीकर कायदा' लागू होणार आहे. प्राप्तीकराचा परतावा भरण्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत मुदत देण्यात आली आहे. १२ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न पूर्वीप्रमाणेच करमुक्त असेल, म्हणजे कराच्या टप्प्यांमध्ये काहीही पालट नाही. आता प्राप्तीकर भरणे अधिक सुटसुटीत आणि सोपे झाले आहे, म्हणजे ही प्रणाली सोपी करण्याचा प्रयत्न केंद्रशासनाने केला आहे. स्वतःचे उत्पन्न चुकीचे दाखवणाऱ्यांवर किंवा लपवणाऱ्यांवर मात्र सरकार कारवाई करणार आहे. करदात्याने त्याचे उत्पन्न चुकीचे दाखवले किंवा लपवले, तर त्याला कराच्या रकमेच्या १०० टक्क्यांपर्यंत दंड आकारला जाईल. करप्रणालीमध्ये पारदर्शकता वाढवणे आणि प्रामाणिक करदात्यांचा विश्वास राखणे, हे शासनाचे मुख्य ध्येय आहे. त्यामुळे कर भरण्यात गडबड करणाऱ्यांवर अर्थमंत्र्यांनी थेट ३० टक्के कर आकारण्याची घोषणा केली आहे, म्हणजे यातून शासनाने करचुकवेगिरीला आळा घालण्याचा प्रयत्न केला आहे. भारतासारख्या विशाल आणि वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेसाठी असे करणे अत्यंत आवश्यक आहे. कर आकारणी करूनही चालू आर्थिक वर्षात वित्तीय तूट सकल देशांतर्गत उत्पन्नाच्या ४.४ टक्के असणार आहे. कराद्वारे २८ लाख कोटी रुपयांचा महसूल मिळणार आहे. अपघात विमा करमुक्त करूनही जनतेला दिलासा दिला आहे. पायाभूत सुविधांचा विचार करता वेगवान 'कनेक्टिव्हिटी'साठी ७ नवीन 'हायस्पीड कॉरिडॉर'ची घोषणा करण्यात आली आहे. मुंबई–पुणे आणि पुणे–भाग्यनगर यांसह देशात ७ नवीन वेगवान रेल्वे मार्गांची घोषणा करण्यात आली आहे. देशातील खनिज समृद्ध भागांना जोडण्यासाठी २० नवीन देशांतर्गत जलमार्ग विकसित केले जाणार आहेत, म्हणजे जलमार्ग वाहतुकीवर शासन अधिक भर देणार आहे. देशातील वाढती लोकसंख्या आणि तिला गतीमान भ्रमण करण्यामध्ये वाहतूककोंडी, गर्दी यांची आव्हाने आहेत. त्या पार्श्वभूमीवर जलवाहतुकीचा पर्याय उत्तम आहे. पूर्व–पश्चिम मालवाहू वाहतुकीसाठी दानकुनी ते सुरत यामध्ये नवीन समर्पित मार्ग बांधला जाईल. 'ॲनिमेशन' आणि 'गेमिंग' क्षेत्रांसाठी महाविद्यालयांमध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारल्या जातील; कारण आता या क्षेत्रांनाच मोठी मागणी आहे. जे विषय लोकांना रोजगार मिळवून देतील, ते शिकवण्याचा प्रयत्न स्तुत्य मानावा लागेल. सर्वात महत्त्वाचे, म्हणजे 'सेमीकंडक्टर' क्षेत्रावर ४० सहस्र कोटी रुपयांची अवाढव्य गुंतवणूक करण्यात आली आहे. येणारे युग हे 'सेमीकंडक्टर'चे असेल. सध्या जगभरात तैवान, चीन, दक्षिण कोरिया हे या क्षेत्रातील 'दादा' देश आहेत. त्यामुळे भारतासारख्या पुष्कळ तरुण संख्या असणाऱ्या देशाने जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी 'सेमीकंडक्टर' क्षेत्र वाढवणे आवश्यक आहे. यातून रोजगाराच्या संधीही मोठ्या प्रमाणात निर्माण होतील. 'कोविड' महामारीनंतर योग आणि आयुर्वेद यांना जगभरात मान्यता मिळाली. आयुर्वेद अभ्यासासाठी ३ नवी 'ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ आयुर्वेद' स्थापन करण्याची घोषणा केली आहे, ज्यामुळे आयुर्वेद शिक्षण, संशोधन आणि आरोग्यसेवा या क्षेत्रांना मोठे संचलन मिळेल. हिंदुस्थानला 'मेडिकल टुरिझम केंद्र' बनवण्यासाठी देशभरात ५ ठिकाणी 'मेडिकल हब' स्थापन करण्यात येणार असून कर्करोग आणि मधुमेह यांवरील औषधे स्वस्त करण्यात येतील. 'बायो–फार्मा' क्षेत्रासाठी १० सहस्र कोटी रुपयांच्या 'बायोफार्मा शक्ती मिशन' प्रकल्पाची घोषणा केली. आयुर्वेदाच्या नावाने पुरोगामी आणि तथाकथित सुधारणावादी यांनी कितीही नाके मुरडली, तरी आयुर्वेदासाठी करण्यात येणाऱ्या सुविधा पहाता निश्चितच भारताच्या या प्राचीन वैद्यकीय प्रणालीचा भारतच नव्हे, तर जगाला लाभ होत आहे, हे सिद्ध होत आहे. त्या दृष्टीने त्याकडे भारताच्या स्वातंत्र्यानंतर पाहिले गेले नव्हते. अन्यथा भारतीय आयुर्वेद आज जगात 'क्रमांक १'वर आला असता आणि विदेशी मोठ्या संख्येने भारतात आयुर्वेदाचे शिक्षण घेण्यासाठी आले असते; पण असो, आताही वेळ गेलेली नाही. केंद्रशासनाने आयुर्वेदाला चांगले दिवस आणण्याचा निश्चय केला आहे, हे अर्थसंकल्पातील घोषणेवरून स्पष्ट होते. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी तंत्रज्ञानाचा मोठा आधार घेण्यात आला आहे. 'भारत विस्तार' हे बहुभाषिक 'एआय टूल' चालू केले जाईल, ज्यातून शेतकऱ्यांना त्यांच्या मातृभाषेत हवामान, बाजारभाव आणि शेती सल्ला मिळेल, म्हणजे शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाशी जोडून अधिक उत्पन्न मिळवून देण्याचा हा सरकारचा प्रयत्न आहे. समभाग बाजारातील 'ऑप्शन्स आणि फ्युचर्स' व्यापारावरील 'सिक्युरिटी ट्रान्झॅक्शन टॅक्स' ०.०२ टक्के वरून वाढवून ०.०५ टक्के करण्यात आला आहे. त्यामुळे खरेतर समभाग बाजारावर त्याचा परिणाम झाला. यामुळे 'सेन्सेक्स' (निर्देशांक) १८७७, तर 'निफ्टी' ७८३ अंकांनी घसरला होता, म्हणजेच सरकारने येथे कर वाढवल्यामुळे त्याची ही प्रतिक्रिया या बाजारांमध्ये उमटली असली, तरी तो गुंतवणुकीपुरताच परिणाम आहे. परदेशी नागरिकांना भारतात गुंतवणुकीसाठी अधिक सवलत देण्याचा प्रयत्न केला आहे. या वेळी सीतारामन् यांनी 'सरकारच्या विविध योजनांमुळे २५ कोटी नागरिक गरिबीतून बाहेर पडले आहेत', असे सांगितले. यातून देशातील दारिद्र्य न्यून करण्याचे शासनाचे प्रामाणिक प्रयत्न दिसून येतात. एकूणच केंद्रशासनाने अर्थसंकल्प लोककेंद्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. भारतापुढे अमेरिकेच्या आयात शुल्काचे आव्हान आणि शत्रूदेशांची कारस्थाने पहाता देशाला प्रत्येक क्षेत्रात स्वयंपूर्ण होण्याची आवश्यकता आहे, जी या अर्थसंकल्पातून काही प्रमाणात पूर्ण होईल!

## सोन्या-चांदीच्या भाववाढीचे लग्नसराईवर संकट

सोने आणि चांदीच्या दराने पुन्हा एकदा नवा विक्रम केला आहे. सोन्याची किंमत प्रति तोळा १ लाख ८० हजार रुपये तर चांदीची किंमत प्रति किलो ४ लाख १० हजार रुपयांच्या जवळपास आहे. सोने आणि चांदीत झालेल्या दरवाढी मागे कारणे अनेक आहेत. मुख्यत्वे जागतिक अनिश्चितता, भू–राजकीय तणाव (उदा. मध्यपूर्वेतील संघर्ष), अमेरिकन फेडरल रिझर्व्हने व्याजदरात केलेली कपात आणि डॉलरची घसरण ही प्रमुख कारणे आहेत. सोने आणि चांदीच्या दरात गेल्या वर्षापासून सुरू असलेली दरवाढ ही सराफ व्यापाऱ्यांना आणि सामान्य ग्राहकांसाठी चिंतेची बाब बनली आहे. लग्न सराई, सण–उत्सव आणि कोणत्याही शुभ कार्यासाठी सोने–चांदी खरेदी करणे ही भारतीयांची परंपरा आहे. पण अचानक दिवसागणिक होणारी दरवाढ ही सराफ बाजाराचा समतोल बिघडवणारी आहे. नोव्हेंबर ते जून हे महिने भारतीय दिनदर्शिकेनुसार लग्नसराईसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जातात. याच काळात सोने आणि चांदीच्या दागिन्यांच्या खरेदीसाठी सामान्य ग्राहक बाजारात येतात. लग्नासारख्या शुभ कार्यासाठी साधारण प्रत्येक ग्राहकाची क्षमता ही ३ ते ५ तोळे सोने खरेदी करण्याची असते. पण अचानक झालेल्या भाववाढीमुळे ग्राहकांची ही क्रयशक्ती घटल्याचे सराफ व्यापाऱ्यांकडून सांगितले जात आहे.

पारंपरिक भारतीय समाजात, लग्नावेळी मुलीला दिले जाणारे सोन्याचे दागिने हे तिचे स्त्रीधन मानले जाते. हे दागिने तांत्रिकदृष्ट्या स्त्रीच्या मालकीचे असतात, जे तिला भविष्यात कोणत्याही आर्थिक अडचणीच्या वेळी स्वावलंबन आणि सुरक्षा देतात. कुटुंबाकडे किती सोने आहे, यावरून अनेकदा समाजातील त्यांची पत किंवा श्रीमंती मोजली जाते. मोठ्या समारंभात किंवा लग्नात सोन्याचे दागिने घालणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते. मुलीला किती तोळे सोने घातले, असा प्रश्न सर्रास प्रत्येक लग्नात आप्तेष्टांकडून विचारला जातो. परंतु हाच प्रश्न विचारणंदेखील आता अवघड होऊन बसलंय.

सामान्य कुटुंबात लग्नसराईत सोने खरेदी करणे हे मोठे कार्य असते. सोन्या चांदीची खरेदी पकडून लग्नाचे बजेट हे ५ ते ७ लाख असते. ३ ते ५ तोळे सोने, एखादे चांगले मंगल कार्यालय, पंचपक्वानाचं जेवण, त्यातल्या त्यात उंची कपडे आणि थोडासा डामडौल असे लग्नाचे स्वरूप असते. सोन्याच्या किमती वाढल्यामुळे हेच बजेट पूर्णपणे कोसळले आहे. लग्नाचे संपूर्ण बजेट हे एकट्या सोन्याच्या दागिन्यांसाठी लागत असल्याची खंत लोकांकडून व्यक्त केली जात आहे. वाढलेल्या किमतींमुळे मध्यमवर्गीयांच्या बजेटबाहेर सोने गेले आहे. यामुळे दागिन्यांच्या विक्रीत मोठी घट झाली असून ग्राहक आता केवळ लग्नसराईसाठी आवश्यक तेवढेच सोने खरेदी करत आहेत.

भारतीय लग्नकार्यात सोन्याची चेन, मंगळसूत्र, अंगठी आणि बांगड्या. तर चांदीच्या दागिन्यांमध्ये जोडवी आणि पैंजण या गोष्टी अनिवार्य मानल्या जातात. परंतु, सध्याच्या वाढत्या दरांमुळे ही खरेदी आता आवाक्याच्या बाहेर गेली आहे. लग्नाचे बजेट ठरवताना सोन्या चांदीच्या दागिन्यांचा वाटा इतका मोठा झाला आहे की, इतर खर्चात कपात करण्याची वेळ कुटुंबांवर आली आहे. गृहिणी आपल्या संसारातील पै–पै वाचवून सणासुदीला एखादा छोटा दागिना घेण्याची जिद्द बाळगतात, पण सोन्याच्या दुकानातील पाटीवरील दर पाहून ग्रॅममध्ये सोने–चांदी घ्यावे लागत आहे. सराफ बाजारातील विक्रेत्यांनी याबाबत नवी माहिती दिली आहे. सोन्याचे दर प्रतितोळा विक्रमी पातळीवर पोहोचल्याने सामान्य ग्राहकांसाठी २२ किंवा २४ कॅरेटचे दागिने खरेदी करणे आता आवाक्याबाहेर जाऊ लागले आहे. अशा परिस्थितीत, ग्राहक १८ कॅरेट



सोन्याचे दागिने खरेदी करण्यास प्राधान्य देत आहेत. एकेकाळी केवळ हिऱ्यांच्या दागिन्यांसाठी वापरले जाणारे १८ कॅरेट सोने आता नियमित दागिन्यांसाठीही लोकप्रिय ठरत आहे. २४ कॅरेट सोने अत्यंत मऊ असते, तर २२ कॅरेटमध्येही लवचिकता असते. १८ कॅरेटमध्ये ७५ टक्के सोने आणि २५ टक्के इतर धातू (तांबे, चांदी किंवा झिंक) असतात. यामुळे हे सोने अधिक कडक आणि मजबूत असते. रोजच्या वापराच्या अंगठ्या, चेन किंवा बांगड्यांसाठी १८ कॅरेट अधिक टिकाऊ ठरते.

सोन्या–चांदीच्या वाढत्या दरांमुळे ग्राहकांमध्ये भीती आणि सावधगिरीचे वातावरण आहे. ज्या कुटुंबात लग्नसराई आहे, त्यांनी सोन्याच्या खरेदीत हात आखडता घेतला आहे. उदा. पूर्वी जर एखादा ग्राहक ५ तोळे सोने घेणार असेल, तर आता तो ३ तोळ्यांवर समाधान मानत आहे. पैसे वाचवण्यासाठी आणि कमी पैशात जास्त दागिने खरेदी करण्यासाठी १८ कॅरेटच्या दागिन्यांना ग्राहक पसंती देत आहेत. यासोबतच नवीन सोने खरेदी करण्यासाठी पैसे कमी पडत असल्याने, अनेक ग्राहक घरातील जुने सोने मोडून त्या बदल्यात नवीन दागिने घडवून घेत आहेत. सोन्याच्या दागिन्यांसाठी द्यावा लागणारा जीएसटी आणि घडणावळ ही देखील ग्राहकांसाठी खर्चिक बाब आहे. तुम्ही २४ कॅरेट, २२ कॅरेट किंवा १८ कॅरेट कोणत्याही शुद्धतेचे सोने खरेदी केले, तर सोन्याच्या एकूण किमतीवर ३ टक्के जीएसटी आकारला जातो. तर घडणावळीवर ५ टक्के जीएसटी आकारला जातो. सोप्या शब्दात सांगायचं झालं तर तुम्ही १ लाखाचे सोने घेतले तर त्यावर ३ टक्के म्हणजेच ३००० रुपये जीएसटी आकारला जाईल. त्याची घडणावळ म्हणजेच मजुरी १० हजार असेल तर त्यावर ५ टक्के जीएसटी घेतला जाईल म्हणजेच ५०० रुपये. त्यामुळे १ लाख रुपये सोन्याच्या दागिन्याची एकूण किंमत ही GYOXPX आणि घडणावळ पकडून १ लाख १३ हजार ५०० रुपये होईल. सोने आणि चांदीच्या बदलत्या दरांचा परिणाम सराफ बाजारातील विक्रेत्यांवरही झाला आहे. मोठ्या शोरूम्सपासून लहान दुकानदारांपर्यंत सर्वांनीच मान्य केले आहे की, दुकानातील ग्राहकांची ये–जा ३० ते ४० टक्क्यांनी कमी झाली आहे. ग्राहक टिकवून ठेवण्यासाठी अनेक विक्रेत्यांना 'घडणावळ' किंवा मेकिंग चार्जेसवर मोठी सूट द्यावी लागत आहे, त्यामुळे त्यांच्या नफ्यावर परिणाम होत आहे. चांदीचे दर ४ लाखांच्या आसपास गेल्याने, पायपट्टया किंवा चांदीची भांडी घेणारा मध्यमवर्गीय ग्राहक पूर्णपणे कमी झाला आहे.

सध्याच्या काळात 'लग्न' हा केवळ दोन जीवांचा किंवा कुटुंबांचा संगम राहिला नसून, तो एक अतिखर्चिक इव्हेंट बनला आहे. मध्यमवर्गीय आणि शेतकरी कुटुंबांसाठी तर लग्नाचा खर्च पेलणे म्हणजे आयुष्यभराची कमाई एका दिवसात खर्च करण्यासारखे झाले आहे. अलीकडच्या काळात लग्नाचे स्वरूप इतके भव्य झाले आहे की, सामान्य माणसासाठी ते एक मोठे आर्थिक संकट बनत चालले आहे. हल्ली प्री–वेडिंग शूट, हळदीचा इव्हेंट, संगीत सोहळा आणि एन्ट्रीसाठी होणारी रोषणाई यावर वारेमाप खर्च केला जातो. लोक काय म्हणतील? आणि त्यांच्या मुलाच्या लग्नापेक्षा आपल्या मुलीचं लग्न जास्त थाटात झालं पाहिजे, ही चढाओढ सामान्य माणसाला कर्जबाजारी करत आहे. अशा परिस्थितीत दागिन्यांचा खर्चही वाढल्याने सामान्य कुटुंबातील लग्नसोहळ्यांचा खर्च १२ ते १५ लाखांवर पोहोचला आहे. याठिकाणी आपण सोने आणि चांदीच्या दरात इतकी झपाट्याने वाढ का होत आहे? हे देखील समजून घेतले पाहिजे. सोन्याच्या दराने अचानक गाठलेला उच्चांक ही केवळ स्थानिक बाब नसून, त्याचे धागेदोरे जागतिक राजकारण आणि अर्थकारणाशी जोडलेले आहेत. जागतिक स्तरावर जेव्हा युद्धाची परिस्थिती किंवा राजकीय अस्थिरता निर्माण होते, तेव्हा गुंतवणूकदार शेअर बाजार किंवा चलनाऐवजी 'सोने' हा सर्वात सुरक्षित पर्याय निवडतात. सध्या अमेरिका, इराण आणि इस्रायल यांच्यातील वाढत्या तणावामुळे जागतिक बाजारात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. युद्धाच्या भीतीने जगभरातील मोठ्या बँकांनी आणि गुंतवणूकदारांनी सोन्याची मोठ्या प्रमाणावर साठवणूक सुरू केली आहे. त्यामुळे मागणी वाढली आणि पर्यायाने भावही वाढले आहेत.

जगातील विविध देशांच्या मध्यवर्ती बँका (उदा. चीन, भारत, रशिया) आपल्या गंगाजळीत सोन्याचा साठा वाढवत आहेत. डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी अनेक देश सोन्याची खरेदी करत आहेत. जेव्हा 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया' किंवा 'पीपल्स बँक ऑफ चीन' सारख्या संस्था टनांनी सोने खरेदी करतात, तेव्हा जागतिक बाजारात पुरवठा कमी होतो आणि परिणामी भाव गगनाला भिडतात आणि याचा फटका सामान्य नागरिकांना बसतो. त्यामुळे सध्याच्या घडीला सोने चांदीचे वाढते भाव आणि मुलांची लग्नकार्ये हा अनेक कुटुंबांसाठी चिंतेचा विषय बनला आहे.

## आहे त्यातच चालवा आणि चित्ताला समाधानी ठेवा

भारताच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी त्यांच्या कारकीदीर्तील नववा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पाचे एका ओळीत वैशिष्ट्य सांगायाचे झाले तर, दक्षिण भारतातील निवडणूक घोषणापत्र असेच याचे वर्णन करावे लागेल. अर्थसंकल्पातील सर्व संकल्पित प्रस्ताव हे केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगालसाठीचे आहेत. उरला सुरला निधी आणि संकल्पचित्र गुजरातसाठी राखून ठेवला आहे. सर्वसामान्य नोकरदारवगार्ला अर्थसंकल्पातून गेल्या काही वर्षापासून कोणतीच अपेक्षा राहिलेली नाही. ना कमाई वाढत आहे ना प्राप्तीकराची सवलत वाढत आहे. त्यामुळे आलेला रुपया जाणार तो साठवण्यासाठी, वाढवण्यासाठी कोणतीही तरतूद निर्मला सीतारामन करत नाहीत. शेअर बाजार एक हजार अंकांनी कोसळला. रविवारी अर्थसंकल्प सादर होत असल्यामुळे विशेष सत्रासाठी बाजार सुरू करण्यात आला होता. मात्र पडझडीसह बंद झाला. सीतारामन यांनी अर्थसंकल्पात फ्युचर आणि ऑप्शनवरील सिक्युरिटीज ट्रॅन्झॅक्शन टॅक्स वाढवण्याची घोषणा केल्याचा हा परिणाम होता. यामुळे गुंतवणूकदारांमध्ये नाराजी पसरली. गेल्या सहा वर्षांमध्ये बजेटच्या दिवशी झालेली ही सर्वात मोठी पडझड आहे. यावरुन या बजेटवर ना गुंतवणूकदार खूश आहेत, ना नोकरदार अशी स्थिती आहे.

पंतप्रधान मोदींनी आपलीच पाठ थोपटून घेत, अपार अवसरो का राजमार्ग, वर्तमान स्वप्नांना साकार करणारा अर्थसंकल्प, भारताच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी सशक्त करणारे बजेट. २०४७ च्या उंच उड्डाणाचा मजबूत आधार हा अर्थसंकल्प असल्याचे सांगितले. हातात रंगाचे डबे घेऊन फिरणार्या या सरकारने नावे बदलण्याशिवाय या १२ वर्षात काहीही केले नाही, हेच या अर्थसंकल्पातून दाखवून दिले. पुन्हा एकदा सी प्लेनचे स्वप्न रंगवण्यात आले. याआधी यासाठी २० कोटी दिले होते, याचाही विसर आता सरकारला पडलेला दिसतो. विमा क्षेत्राला काही विशेष सवलतींची इच्छा होती. आरोग्य विमादेखील एक प्रकारची बचत आहे. याचा विचारच निर्मलाताईंनी केला नाही. अमृत सरोवर योजना २०२० मध्ये घोषित करण्यात



आली होती. प्रत्येक जिल्ह्यातील तलावांची स्थिती तुम्ही तुमच्या डोळ्यांनी पाहू शकता. गेल्या सहा वर्षात तुम्ही तिथे फिरायला गेला नसाल तर आता एकदा जाऊन पाहाच. स्मार्ट सीटी योजना कधीकाळी आली होती, याचाही आता लोकांना विसर पडला असेल, असे गृहीत धरुन मोदी सरकारच्या मंत्री सीतारामन यांनी पाच लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या टियर–२ आणि टियर–३ शहरांच्या विकासासाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्याची घोषणा केली. जनतेला स्वप्न दाखणे काही वाईट नाही, पण दिवास्वप्न दाखवणे अजून शिक्षेस पात्र नाही म्हणून ठिक आहे.

निर्मलाताईंनी एक महत्त्वाकांक्षी योजना आणली आहे. प्रत्येक जिल्ह्यात महिलांसाठी वसतीगृह उभारण्याची घोषणा केली गेली. लाडक्या बहिणींसाठीची ही योजना जर सत्यात उतरवली गेली तर नक्कीच त्यातून नवा भारत घडण्यास मदत होईल. घोषणा तर केली, आता गरज आहे अंमलबजावणीची. या योजनेची स्मार्ट सिटी होऊ नये एवढीच अपेक्षा. बेरोजगार, शेतकरी, शेतमजूर, कामगार यांच्या आवाक्याबाहेरचे हे बजेट आहे. देशात कमी झालेल्या उत्पादकतेकडे लक्षच देण्यात आलेले नाही. २०१४ मधील मेक इन इंडिया आणि २०१५ च्या स्किल इंडियाचे पुढे काय झाले? आता कर्तव्याच्या काही गोष्टी निर्मलाताईंनी केल्या, मात्र त्यांनाच त्यांच्या कर्तव्याची आठवण करुन देण्याची जनतेवर वेळ आली आहे. २०२४ च्या अर्थसंकल्पात सीतारामन यांनी सांगितले होते की, ५० लाखांपेक्षा कमीचे आणि तीन वर्षे जुने प्रकरण असेल तर त्यासाठी पुन्हा हे प्रकरण सुरू होणार नाही. चौकशीची मुदत १० वर्षावरुन ६ वर्षे करण्यात आली होती. याचा अर्थ भारतातील कॉर्पोरेट जगत २०१९ पासून टॅक्स सूट मिळवत आले. एकूण कर उत्पन्नात कॉर्पोरेट तिर्सया क्रमांकावर आहे, तर प्रत्यक्ष कर भरणारे सामान्य नागरिक पहिल्या क्रमांकावर आहेत. ८० टक्के कर सामान्य नागरिक देत आहेत. म्हणजेच कॉर्पोरेट वर्ग करही भरत नाही आणि गुंतवणूकही करत नाही अशी स्थिती आहे. सामान्य नागरिकच कराचा भार वाहत आहे, त्याला कोणतीच सूट नाही. कॉर्पोरेटसाठी मात्र मित्र नेमला जाणार आहे.

उत्पादन क्षेत्रात भारत आशिया खंडात सहाव्या क्रमांकावर आहे. चीन सर्वात पुढे. गेल्या १२ वर्षात चिनी सामानावर बहिष्काराच्या पोकळ घोषणांशिवाय उत्पादन निर्मितीत भारताने चीनला धोबीपछाड सोडा चपराकही लगावलेली नाही. अवघ्या १२ वर्षातच भाजप सरकारमध्ये नाविन्याचा अभाव दिसून आला आहे. त्याच योजना नव्या नावाने आणल्या जात आहेत. संकल्प से सिद्धी, विकसित भारत, आत्मनिर्भर भारत असे वेगवेगळे भारताचे स्वप्न दाखवले जाते. प्रत्यक्षातल्या भारतात तुम्ही आम्ही रोजच लोकलचे धक्के खात आहोत. सात हायस्पीड रेल्वेची घोषणा करण्यात आली. आता मुंबईकर, पुणेकर हैदराबादी बियार्णी हायस्पीडने जाऊन चाखू शकणार आहेत. 20 नव्या जलमार्गांची सुरुवात केली जाणार असल्याची घोषणा करण्यात आली. 2016 पासून हे स्वप्न दाखवले जात आहे. मात्र ते प्रत्यक्षात आलेले नाही. या बजेटमध्ये सर्वाधिक निधीची तरतूद परिवहन मंत्रालयासाठीच करण्यात आली आहे. यातील किती महामार्ग हे गुजरातमध्ये होणार आणि आगामी विधानसभा निवडणूक असलेल्या केरळ, तामिळनाडूतून जाणार, या राज्यात भूमीपूजन सोहळे होणार यावरुन स्पष्ट होईलच. पण सामान्य जनतेनेही लक्षात घेण्याची गरज आहे की, स्वप्न किती काळ पाहायचे. कारण मोदी सरकारला सत्तेत येऊन १२ वर्षे होऊन गेली आहेत, आता मागील सरकारला दुषणे देणे आणि सर्व जबाबादारी पहिले पंतप्रधान पंडित नेहरुंवर ढकलून नामानिराळे होता येणार नाही. अर्थसंकल्पाची एकूणच स्थिती पाहता आहे त्यातच चालवा आणि चित्ताला समाधानी ठेवा, असेच म्हणावे लागेल.

## मुंबई महापालिकेत 'नवा भिडू, नवे राज्य'




मुंबई महापालिकेच्या राजकारणात तब्बल तीन दशकांनंतर मोठे सत्तांतर घडले असून, ठाकरे सेनेचा बालेकिल्ला भाजप-शिंदे सेनेच्या ताब्यात गेला आहे. त्यामुळे मुंबई महापालिकेत ‘नवा भिडू, नवे राज्य’ या नव्या राजकीय पवार्ची सुरुवात झाली आहे.

गेल्या तीन दशकांहून अधिक काळ मुंबई महापालिकेत ठाकरे सेनेची सत्ता होती. ठाकरे सेनेच्या सोबतीला भाजपही होतीच. परंतु मुंबई महापालिकेत कमळ फुलवण्याचे भाजपचे स्वप्न होते. मात्र ठाकरे सेना आणि मुंबई हे अतुट नातं यामुळे मुंबई महापालिकेवर ठाकरे सेनेचे वर्चस्व होते. मराठी माणसांचीच शिवसेना म्हणूनच आजही मतदारराजा कुठल्याही लालसेला बळी न पडता शिवसेनेच्या हाती मुंबई महापालिकेच्या तिजोरीच्या चाव्या देत आला. परंतु लोकसभा, त्यानंतर पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत जनतेने भाजपला कौल दिला आणि राज्यात एकनाथ शिंदे यांच्या मदतीने भाजपची सत्ता स्थापन झाली आहे.

राज्यातील सत्ता काबीज केल्यानंतर भाजपने मुंबई महापालिकेवर कमळ फुलवण्यासाठी रणनीती आखली. तीन दशकांहून अधिक काळ मुंबई महापालिकेतील सत्ता काबीज करण्याचे भाजपचे स्वप्न प्रत्यक्षात साकार झाले. जानेवारी २०२६ मध्ये नुकत्याच पार पडलेल्या मुंबई महापालिका निवडणुकीत भाजपने बहुमताचा आकडा गाठला. भाजप व शिंदेसेनेने एकत्र निवडणूक लढवत भाजपचे ८९, तर शिंदेसेनेचे २९ नगरसेवक निवडून आले आहेत. त्यामुळे मुंबई महापालिकेत भाजपच मोठा भाऊ आहे. मुंबई महापालिकेत सत्ता स्थापन करण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरले असून केंद्रात, राज्यात आणि मुंबईत भाजपची सत्ता, त्यामुळे मुंबईकरांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात भाजप यशस्वी ठरणार का, याचे उत्तर पुढील काही महिन्यांत मिळेलच.

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेची ही मुंबई महापालिकेतील पहिलीच अधिकृत एंट्री आहे. ठाकरे यांच्या शिवसेनेचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या मुंबईत शिंदे गटाने स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. मुंबई महापालिकेतील सत्तेत सहभागी होणे, हा केवळ प्रशासकीय बदल नाही, तर ठाकरेंच्या राजकीय वर्चस्वाला दिलेले थेट आव्हानच म्हणावे लागेल. भाजपचा विचार केला, तर एकेकाळी शिवसेनेच्या सावलीत असलेला पक्ष आज मुंबईत सर्वाधिक संख्याबळ असलेला पक्ष ठरला आहे. याच भाजपने काही वर्षांपूर्वी 'चौकीदाराची भूमिका' स्वीकारत महापालिकेत सत्तेपासून दूर राहण्याचा निर्णय घेतला होता. तेव्हा भाजप आणि शिवसेनेतील मतभेद टोकाला गेले होते. मुख्यमंत्रीपदावरून उभा राहिलेला संघर्ष पुढे जाऊन पक्षफुटीपर्यंत पोहोचेल, याची तेव्हा कुणालाही कल्पना नव्हती. आज मात्र परिस्थिती पूर्णतः बदलली आहे. भाजप आणि शिंदेसेनेची युती ही केवळ सोयीची नसून, सत्तेच्या स्थैयार्साठी आखलेली रणनीती आहे. देशातील सर्वात श्रीमंत आणि प्रभावशाली स्थानिक स्वराज्य संस्थेवर नियंत्रण मिळवणे, हे दोन्ही पक्षांसाठी राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहे. हजारो कोटींचा अर्थसंकल्प, नागरी सुविधा, विकास प्रकल्प आणि प्रशासकीय निर्णयांवर थेट प्रभाव टाकण्याची क्षमता या सत्तेमुळे मिळणार आहे. त्यामुळे तीन दशकांनंतर मुंबईत पाय रोवणाऱ्या भाजपसमोर अनेक आव्हाने आहेत. सत्ता टिकवणे, विरोधी पक्षाच्या टीकेला सामोरे जाणे, विरोधकांच्या प्रश्नांचे समाधान करणे आणि पारदर्शक कारभार चालवणे, सत्तेत सहभागी शिंदेसेनेच्या नगरसेवकांची मर्जी राखणे हे येणाऱ्या काळात भाजपसाठी आव्हानात्मक आहे.

'नवा भिडू, नवे राज्य' म्हणजे नव्या अपेक्षाही. मुंबईकर आता फक्त राजकीय गणित पाहणार नाहीत, तर रस्ते, पाणी, आरोग्य, कचरा व्यवस्थापन, पूरनियंत्रण आणि पारदर्शक कारभार या मुद्द्यांवर ठोस कामगिरीची अपेक्षा ठेवणार. सत्तांतर झाले, चेहरे बदलले; पण कारभारात बदल दिसणार का, हा खरा कस लागणार आहे. एकूणच मुंबई महापालिकेतील सत्तास्थापना म्हणजे जुन्या राजकारणाचा शेवट आणि नव्या राजकीय समीकरणांची सुरुवात आहे. 'नवा भिडू' मैदानात उतरला आहे, आता 'नवा भिडू' मुंबईकरांच्या मनात किती स्थान मिळवतो, हे येणारा काळच ठरवेल. २०२९ मध्ये भाजप स्वबळावर निवडणूक लढणार, असा नारा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मुंबईत दिला आहे. त्यामुळे २०२९ मध्ये होणाऱ्या निवडणुकीत भाजप एकहाती सत्ता काबीज करण्यासाठी पूर्ण ताकदीनिशी कामाला लागणार आहे. मात्र सध्या देशातील ज्या राज्यात भाजपची सत्ता आहे, त्या ठिकाणच्या जनतेच्या आशा–अपेक्षा पूर्ण करणे भाजपची जबाबदारी असणार आहे.


मुंबई ठाकरे सेनेपासून वेगळी करण्यात भाजपला यश आले. आता मुंबई महापालिकेच्या तिजोरीच्या चाव्या भाजपच्या हाती आहेत. करदात्या मुंबईकरांना सोयीसुविधा उपलब्ध करून देताना मुंबई महापालिकेचा आर्थिक डोलारा कोसळणार नाही, याची काळजी घेणे भाजपला क्रमप्राप्त आहे. सत्ता मिळाली म्हणजे सगळं संपलं असं नसतं हे राजकारण्यांना चांगलंच अवगत आहे. त्यामुळे मुंबईतील सत्ता टिकवण्यासाठी भाजपची कसोटीच लागणार आहे. विरोधकांना सांभाळणे, मुंबईकरांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे याहीपेक्षा म्हणजे सत्तेतील वाटेकरी शिंदेसेनेला सांभाळणे भाजपसाठी डोकेदुखी ठरणार आहे, तर दुसरीकडे मुंबई महापालिका निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करणे भाजपसाठी जिकरीचे ठरणार आहे.

मुंबई महापालिकेच्या ठेवी ८० हजार कोटींच्या घरात असल्या तरी ३० हजार कोटी कंत्राटदारांची सुरक्षा अनामत रक्कम आहे, तर ३० हजार कोटी रुपये पालिकेतून सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या देणी देण्यासाठी आहेत, तर मुंबई महापालिकेचे विविध प्रकल्प सुरू असून त्या प्रकल्पाच्या खचार्साठी ठेवीतील रक्कम वापरली जाते. त्यामुळे प्रत्यक्ष मुंबई महापालिकेच्या ठेवी १० हजार कोटींच्या घरात आहेत, तर दुसरीकडे मुंबई महापालिकेचे उत्पन्नाचे स्रोत नाही. या सगळ्या गोष्टींचा विचार करत भाजपला पुढील पाच वर्षे मुंबई महापालिकेचा गाडा हाकणे आहे. त्यामुळे भाजपने २०२९ चे लक्ष डोळ्यासमोर ठेवून आपली जबाबदारी पार पाडणे अपेक्षित आहे.

# पनीर कटलेट

**साहित्य :** २०० ग्रॅम पनीर कुस्करून, २ मध्यम आकाराचे कांदे चिरून, १ गाजर किसून, १ वाटी बारीक चिरलेला कोबी, २ बटाटे उकडून कुस्करून, १ चमचा आले-लसूण पेस्ट, १ चमचा मिरची-कोथिंबीर पेस्ट, २ मोठे चमचे कॉर्नफ्लॉवर, गरजेनुसार मिठ, पाव ते अर्धा वाटी तेल, चाट मसाला.

**कृती :** भांड्यात तेल गरम करून त्यावर चिरलेला कांदा घाला. कांदा गुलाबी रंग येईपर्यंत शिजला की त्यावर



आले-लसूण पेस्ट व मिरची-कोथिंबीर पेस्ट घालून ढवळा. वरील मिश्रणावर कोबी, गाजर घालून २-३ मिनिटेच परतवत शिजवा. चायनीज पदार्थांसारखेच जास्त शिजू देऊ नका. आता कुस्करलेले बटाटे, मिठ घालून पुन्हा चांगले ढवळून लगेच गॅस बंद करा. हे मिश्रण एका ताटात पसरवा व जरा थंड होऊ द्या. मिश्रण थंड झाले की त्यात पनीर व कॉर्नफ्लॉवर टाकून मिश्रण एकजीव करा. आता तुम्हाला हव्या त्या आकाराचे कटलेट करा. व नॉनस्टिक पॅनवर जरासेच तेल घालून शॅलो फ्राय करून घ्या. दोन्ही बाजू मध्यम आचेवर साधारण ५-६ मिनिटे शिजवा. कटलेट तयार झाले की गरम असतानाच त्यावर चाट मसाला टाका. नुसते किंवा सॉस किंवा पुदिना चटणीबरोबर याचा आस्वाद घ्या.

**अधिक टिप :**

- **या कटलेटमध्ये इतर कोणतेही मसाले न वापरल्याने पनीर व भाज्यांचा अस्सल स्वाद येतो.**
- **लहान मुलांना तर खूपच आवडतात. शिवाय कोबीसारखी भाजी खाल्ली जाते.**
- **यात अजून कांद्याची पात, किंवा आपल्या आवडीच्या भाज्या थोड्या प्रमाणावर घालू शकता.**

# न्यूड मेकअप लूकसाठी काही टिप्स



**न्यूड मेकअप लूकचा सध्या खूपच वापर केला जातो. यासाठी ब्लॅक मस्कराचा वापर करा. आपल्याला त्वचेला सूट होईल असा नैसर्गिक रंग आणि गुलाबी रंगाच्या लिप कलरचा वापर करा. आकर्षक दिसण्यासाठी न्यूड मेकअप लूकसाठी कोणत्या टिप्सचा वापर केला पाहिजे, ते जाणून घ्या.**

- आपल्या डोळ्यांना नॅचरल लूक देण्यासाठी पापण्यांना ब्लॅक मस्करा लावा आणि केस कुरळे करा.
- डोळ्यावरच्या आतील कोपऱ्यापर्यंत काजळ लावा. त्यामुळे पापण्या सुंदर आणि आकर्षक दिसतील.
- गालावर नॅचरल चमक येण्यासाठी चीकबोन्सला हायलाइट करा. सध्या न्यूड मेकअप लूकसाठी आपल्या त्वचेला सूट होईल अशा नॅचरल शेडची निवड करा.
- यासाठी हलक्या रंगाचा वापर करा. चेहरा चमकण्यासाठी ओठांना हलक्या गुलाबी रंगाची पिंक शेडची लिपस्टिक लावून त्यावर शाईन येण्यासाठी लिप ग्लॉसचा वापर करा. त्यामुळे अजूनच आकर्षक लूक येईल.
- न्यूड मेकअप लूकसाठी एकाच रंगाच्या वेगवेगळ्या शेड्सचा वापर करा.
- न्यूड शेड्स लावण्याआधी लाईट बेस लावा आणि आवश्यक असल्यास हलक्या हातांनी लूज पावडर किंवा कॉम्पॅक्ट पावडर लावा.

# गरम पाणी पिण्याचे फायदे

**बहुतेक लोक आपल्या दिवसाची सुरुवात चहा किंवा कॉफीच्या गरमागरम कपाने करत असतात. काही लोकांना तर सकाळी उठल्या उठल्या चहा किंवा कॉफी मिळाली नाही, तर त्यांचा अख्खा दिवस वाईट जातो, इतकी त्यांना चहा किंवा कॉफीची सवय झालेली असते. पण या सवयीमुळे कालांतराने बद्धकोष्ठ, पोटदुखी, ॲसिडिटी, पिंपल्स अशा तक्रारी सुरू होतात. असे म्हटले जाते की त्वचा, केस आणि एकंदर शरीराचे आरोग्य सांभाळण्यासाठी भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सकाळी उठल्या उठल्या एक ग्लास गरम पाणी पिण्याची सवयही तुमच्या शरीरातील अनेक विकार मुळापासून दूर करू शकते.**

**सकाळी** उठून नियमितपणे एक ग्लास गरम पाणी प्यायल्याने पचन शक्ती चांगली राहते. तसेच गरम पाणी प्यायल्याने शरीरातील रक्ताभिसरणही चांगले राहते. आपल्या खाण्या-पिण्याच्या अयोग्य सवयींमुळे आपल्या शरीरामध्ये साठत असलेले घातक पदार्थ गरम पाण्याच्या सेवनामुळे बाहेर टाकण्यास मदत होते. तसेच गरम पाण्याच्या नियमित सेवनामुळे शरीरातील अतिरिक्त चरबी घटण्यास मदत होऊन वजन कमी होण्यास मदत होते. योगशास्त्राच्या नियमानुसार तीन महिने गरम पाण्याच्या सेवनाने वजन कमी होऊ शकते. याकरिता इतर कोणतीही विशेष पथ्ये पाळण्याची गरज नाही.

काही लोकांना बद्धकोष्ठाचा त्रास होतो. अशा वेळी सकाळी रिकाम्यापोटी गरम पाणी पिणे फायदेशीर ठरू शकते. पुष्कळ महिलांना मासिक धर्माच्या दिवसांमध्ये डोकेदुखी सतावते. त्यावेळी नियमित गरम पाण्याचे सेवन केल्याने डोकेदुखीपासून आराम मिळतो. तसेच या



दिवसांमध्ये होणारी पोटदुखी ही गरम पाण्याच्या सेवनामुळे कमी होते.

दररोज सकाळी एक ग्लास गरम पाण्यामध्ये थोडासा लिंबाचा रस घालून प्यायल्याने शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढते. ज्यांना सतत बारीकसारीक तब्येतीच्या तक्रारी जाणवत असतील त्यांनी गरम पाणी आणि लिंबाच्या रसाचे दररोज सेवन करणे उत्तम. यामुळे त्वचेचे आरोग्य देखील चांगले राहून, त्वचेवर पिंपल्स येणे कमी होते. तसेच गरम पाण्याच्या सेवनाने ॲसिडिटीचा त्रासही कमी होतो. पुष्कळ लोकांच्या खाण्या-पिण्याचे वेळापत्रक किंवा झोपेच्या वेळा अतिशय अनियमित असतात. शिवाय ज्या लोकांना काही ना काही कारणाने सतत प्रवास करावा लागतो. त्यांनाही बाहेरच्या जेवणावरच काम चालवून घ्यावे लागते. परिणामी ॲसिडिटीसारखे विकार पाठीमागे लागतात. अशा वेळी दररोज सकाळी गरम पाणी पिण्याच्या सवयीने ॲसिडिटीचे प्रमाण कमी होते.

# मासिक पाळी पुढे ढकलताय?

**सण, समारंभ, पर्यटन किंवा धार्मिक कार्याच्या आड येणारी मासिक पाळी पुढे ढकलण्याचा निर्णय अनेक महिला घेतात. मात्र अशा प्रकारे निसर्गचक्रात हस्तक्षेप करणं चुकीचं आहे. बरंच प्रबोधन होऊनही मासिक पाळीबाबतचे गैरसमज कमी झालेले नाहीत. म्हणूनच महिलांना कृत्रिम पद्धतीने पाळी पुढे ढकलावी लागते. मासिक पाळी पुढे ढकलण्यासाठी गोळ्या घेतल्या जातात. पण या गोळ्यांचे शरीरावर दीर्घकालीन परिणाम होतात.**

- मासिक पाळी पुढे ढकलणाऱ्या गोळ्यांच्या सततच्या सेवनामुळे यासंदर्भातल्या नैसर्गिक चक्रावर परिणाम होऊ शकतो. शिवाय महिलांच्या प्रजननक्षमतेवरही याचे घातक परिणाम दिसून येतात.
- या गोळ्यांचं सेवन केल्यानंतर पुढचा काही काळ मासिक पाळीदरम्यान मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव होण्याची शक्यता वाढते. जवळपास २० टक्के महिलांना हा अनुभव येतो. पुढचे काही महिने मासिक पाळीतून अधिक प्रमाणात रक्त जाऊ शकतं.
- या गोळ्या बऱ्याच काळपर्यंत घेत राहिल्यास आरोग्यावर अत्यंत घातक असे परिणाम दिसून येतात. नसांमध्ये रक्ताची गुठळी होण्यासारख्या समस्या जाणवू शकतात. या गोळ्यांमुळे इतर औषधांच्या शरीरावरच्या प्रभावावर विपरित परिणाम होऊ शकतो.
- या गोळ्या घेतल्यानंतर इतर काही दुष्परिणाम होऊ शकतात. जुलाब, हातापायांमध्ये गोळे येणं, अवेळी रक्तस्राव होणं हे दुष्परिणाम दिसून येऊ शकतात.



# कोरफडीचे ५ गुणकारी फायदे

**कोरफड त्वचेसाठी खूप फायदेशीर आहे. याच्या नियमित सेवनाने त्वचेसंबंधित अनेक समस्या दूर होतात. जाणून घ्या कोरफडीचे गुणकारी फायदे...**

- सतत कॉम्प्युटरसमोर बसल्याने डोळ्यांवर ताण येतो. डोळ्यांचे आरोग्य चांगले राहाण्यासाठी दोन चमचे कोरफडीचा गर एक कप पाण्यात मिसळून त्याने डोळे धुवा. यामुळे डोळ्यांना आराम मिळेल.
- चेहऱ्यावर पुटकुळ्या आल्यास कोरफडीचा गर चेहऱ्यावर लावा. थोड्या वेळाने चेहरा साध्या पाण्याने धुवा. यामुळे पुटकुळ्या कमी होतील.
- शरीरावर कापल्यामुळे जखम झाली असल्यास त्यावर कोरफडीचा गर लावा.
- कोंड्याची समस्या असल्यास दोन चमचे कोरफडीचा गर कंडिशनरसोबत मिसळा. यामुळे कोंड्यापासून सुटका होईल.
- दातांच्या हिरड्या मजबूत करण्यासाठी हिरड्यांवर कोरफडीचा गर लावा.

# जाणून घ्या टिकली लावल्याने होणारे फायदे



**टिकलीचाही महिलांच्या १६ शृंगारांमध्ये समावेश असून सौभाग्यवती महिला काही वर्षांपूर्वी कुंकवाचा वापर करत असत. पण कुंकवाचा वापर न करता टिकलीचा वापर सध्या महिलावर्ग मोठ्या प्रमाणात करताना पाहायला मिळतात. महिला चेहऱ्यावर लावण्यात आलेल्या टिकलीमुळे केवळ सुंदरच दिसत नाहीत तर त्याचे अनेक आरोग्यदायी फायदेही आहेत. टिकलीचा वापर सामान्यत: महिला ट्रेडिशनल लूकसाठी करतात. पण एका अभ्यासानुसार आरोग्यालाही टिकलीमुळे अनेक फायदे होतात. यामुळेच टिकलीचा वापर अनेक महिला करत आहेत. एवढेच नाही तर वेस्टर्न कपडे परिधान करणाऱ्या महिलाही आपल्या ड्रेसनुसार कलरफुल टिकली वापरण्यास सुरुवात करत आहेत. चेहऱ्यावरील टिकलीमुळे महिला खुपच सुंदर दिसतात आणि त्यामुळे अनेक आरोग्यदायी फायदेही होतात. कपाळावर टिकली लावण्याने अनेक फायदे होतात.**

**कपाळावर** टिकली लावल्यामुळे डोके दुखणे बंद होते. ॲक्युप्रेशर शास्त्रानुसार कपाळावर ज्या ठिकाणी टिकली लावण्यात येते, त्या जागेवर मसाज केल्यास डोकेदुखी तत्काळ बंद होते. टिकली लावलेल्या जागेवर मसाज केल्यास नाकाच्या आसपास ब्लड सर्क्युलेशन चांगल्या पद्धतीने होण्यास सुरुवात होते, ज्यामुळे तुम्हाला खूपच आराम मिळतो.

टिकली दोन्ही भुवयांच्या मध्यभागी ज्या ठिकाणी लावली जाते, शरीरातील सर्व नसा त्याच केंद्रावर एकत्र येतात. टिकली लावण्यात येणाऱ्या या जागेला अग्निचक्र या नावाने सुद्धा ओळखले जाते. म्हणूनच टिकली लावल्याने एकाग्रताही वाढते आणि मन शांत राहते. तसेच, टिकली लावल्याने ताणतणावही कमी होतो.

तुम्हाला पूर्ण झोप मिळत नाही आणि त्यामुळे तुम्ही त्रस्त आहात तर टिकली लावणे तुमच्यासाठी खूपच फायदेशीर होऊ शकते. टिकली शरीरच्या वरच्या भागाला शांत ठेवण्यासाठी खूपच फायदेशीर ठरते. कपाळावर टिकली लावल्याने चांगली झोप येते.

टिकली डोळ्यांच्या नसा मजबूत करण्यास खूपच मदत करते. टिकली कपाळ्याच्या मध्यभागी ज्या ठिकाणी लावली जाते, त्या



ठिकाणच्या नसा आणि डोळ्यांमधील नसा यांच्यात एक कनेक्शन असते. टिकली डोळ्यांच्या नसांना मजबूत करण्यास मदत करते ज्यामुळे तुम्हाला एकदम स्पष्ट आणि साफ दिसण्यास मदत होते. एवढेच नाही तर टिकली लावल्याने आसपासचे मसल्स मजबूत आणि हेल्दी होतात.

तुमच्या चेहऱ्यावर जर सुरकुत्या पडण्यास सुरुवात होत आहे तर टिकली लावण्यास तुम्ही सुरुवात करा. कारण, टिकली लावल्याने चेहऱ्यावर येणाऱ्या सुरकुत्यांपासून सुटका मिळण्यास मदत होते.

# दुधाबरोबर मध घेण्याचे फायदे जाणून घेऊ या

आपल्याला हे माहितीच आहे की, नियमित दूध पिणं आरोग्यासाठी फायदेशीर आहे. परंतु दुधात मध घातल्यावर त्याचा फायदा दुपटीने होतो. असे केल्यास आरोग्यविषयक समस्यांपासून आपण मुक्त होऊ शकतो.

**दुधामध्ये मध घालून पिण्याचे ५ फायदे जाणून घ्या...**

- दररोज १ कपात दुधात मध घालून प्यायल्याने शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर असते. हे दोन्ही प्रकारच्या क्षमता वाढविण्यास उपयुक्त आहे.



- अनिद्रेची समस्या असल्यास रात्री कोमट दुधात मध वापरा, असे केल्यास अनिद्रेची समस्या नाहीशी होते आणि त्वरित आराम मिळतो.
- पचन सुधारण्यासाठी दुधात मध घालून पिण्याने बद्धकोष्ठतेच्या त्रासापासून सुटका होते.
- दुधात प्रथिने आणि कॅल्शियम भरपूर प्रमाणात असते आणि मध प्रतिकारकशक्ती वाढवण्यास सक्षम असते. यांना एकत्र करून प्यायल्याने उत्तम आरोग्य पर्याय असल्याचे सिद्ध करतात.
- ताणतणाव दूर करण्याचे हे एक उत्तम साधन आहे. कोमट दुधात मध घालून प्यायल्याने प्रजनन क्षमता आणि शुक्राणूंची संख्या वाढवण्यास मदत करते.

**सध्याची बदलती लाइफस्टाइल पाहता काही जणांना कमी वयातच केस पांढरे होत असल्याची समस्या पाठी लागते. कमी वयात केस पांढरे झाल्याने ते तुमच्या पर्सनॅलिटीला न शोभण्यासारखे असून त्याबाबत चिंता सतावते. फॅशन तर दूर कमी वयात केस पांढरे होणे काहीसे लाजीरवाणे आहे. काही लोकांना शारीरिक कमकुवतेमुळे अशा प्रकारची समस्या येते. काहीजण केस पांढरे होत असल्याने गोळ्यासुद्धा घेतात. परंतु गोळ्या घेणे ही बाब चुकीची असून ती तुमच्या आरोग्याला घातक ठरू शकते. त्यामुळे डॉक्टरांचा सल्ला घेतल्याशिवाय कोणत्याही गोळ्यांचे सेवन करू नये असे सांगितले जाते. तुम्हालासुद्धा जर केस पांढरे होण्याची समस्या भेडसावत आहे तर त्यावर आताच उपाय करा. तर जाणून घ्या केस सफेद होत असल्यास कोणत्या गोष्टी खाणे महत्त्वाचे आहे.**

# कमी वयात केस पांढरे होण्याची समस्या सतावत असल्यास करा 'या' गोष्टींचे सेवन

**संत्र्याचे सेवन करा :** कमी वयात केस सफेद होत असतील तर त्यापासून सुटका मिळवण्यासाठी संत्रे खा. कारण संत्र्यात व्हिटामीन सी असून ते तुम्हाला कोलेजन प्रोटीनची वाढ करण्यास मदत करतात. संत्रे खाल्ल्याने केस सफेद होण्याची समस्या कमी होण्यासोबत केसांची वाढ होण्यास मदत होते.

**फर्मेन्टेड फुड्स :** प्रोबायोटिक नेहमीच आरोग्य स्वस्थ राहण्यासाठी उपयुक्त ठरतात. खासकरून केसांसाठी आणि या गोष्टीचे सेवन केल्यास तुम्हाला केस सफेद होण्याची समस्या कमी होईल. फर्मेन्टेड फूड्स म्हणजे दही, विनेगर, आवळासारख्या पदार्थांचा समावेश होतो. काळे केस कायम राखण्यासाठी फर्मेन्टेड फूड्स जरूर खा.

**डार्क चॉकलेट**

शरीरात लोह आणि कॉपरची कमी असल्याने केस सफेद होण्याची समस्या सतावते. त्यामुळे डार्क चॉकलेट हे उत्तम पोषक तत्त्व असून ते सफेद झालेल्या केसांसाठी उपयुक्त ठरते. त्यामुळे डार्क चॉकलेटचे सेवन करा. मात्र तुम्हाला घरगुती नैसर्गिक पद्धतीने केस गळतीची समस्या सोडवायची असल्यास मेथी दाण्यांचा उपयोग करा. मेथीचे दाणे तुम्ही सुक्या आवळ्यासोबत वाटून त्याची पावडर बनवू शकता. त्यानंतर ही पावडर तेलामध्ये मिक्स करून केसांना लावा. यामुळेसुद्धा केसांची गळती थांबण्यास मदत होईल.



# केस रंगवताना घेण्यात येणारी काळजी

सर्वात पहिली काळजी म्हणजे दर्जेदार रंगच निवडा, तिकडे तडजोड नको. पहिल्यांदाच रंग लावत असाल तर केसांच्या छटेपेक्षा वेगळी छटा निवडा; परंतु तो तुम्हाला शोभेल याची खात्री करून घ्या. चांगल्या शॅम्पूने केस धुवा, मात्र कंडिशनर लावू नका. कंडिशनरमुळे रंग नीट बसत नाही. धुतलेले केस विंचरण्यासाठी कायम मोठ्या दातांचा कंगवा वापरा म्हणजे केस जास्त तुटणार नाहीत. केस वाळवण्यासाठी ते टॉवेलने जोरजोरात पुसू नका, म्हणजे ते तुटणार नाहीत. त्याऐवजी डोक्याला टॉवेल गुंडाळून केसांमधील पाणी टॉवेलने टिपून घ्या. केस वाळवण्यासाठी ड्रायरचा वापर करू नका. ओल्या केसांना रंग लावू नका. रंग लावताना हातात मोजे घाला. कपाळावर, कानांवर, मानेवर रंगाचे डाग पडू नयेत म्हणून व्हॅसलीन वा खोबरेल तेल लावा. रंग लावलेले केस लिंबाचा रस घातलेल्या पाण्याने धुवा, जेणेकरून रंग दीर्घकाळ टिकेल. रंग लावल्यावर केसांमधील आर्द्रतेचं प्रमाण कमी होतं व केस कोरडे होतात. त्यामुळे केस धुण्यासाठी रंग लावलेल्या केसांसाठी खास असं नमूद केलेला शाम्पू आणि कंडिशनरच वापरा. केसांची वाढ झाल्यावर केसांच्या मुळाशी त्यांचा नैसर्गिक रंग दिसू लागतो. अशा वेळी केसांना टचअप करायला विसरू नका. टचअप करताना केस मुळाशी आधी रंगवा, १५ मिनिटांनंतर बाकीच्या केसांना रंग लावा.



**चिंच हे नाव घेताच तोंडाला पाणी सुटतं. आंबट-गोड चिंच आरोग्यासाठी फायदेशीर असल्याचे सांगितले जाते. खाद्यपदार्थांची चव वाढवण्यासाठी अनेक प्रकारच्या पाककृतींमध्ये चिंचेचा वापर केला जातो. चिंचेमध्ये प्रोटीन, फायबर, कार्बोहायड्रेट्स, फोलेट, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए, ई, के, बी६, फॉस्फरस, पोटॅशियम, कॅल्शियम, मॅग्नेशियम, लोह यांसारखे पोषक घटक असतात. ज्यामुळे शरीराला अनेक फायदे मिळू शकतात. पण तुम्हाला माहीत आहे का की चिंचेचे जास्त सेवन करणेदेखील आरोग्यासाठी हानीकारक असू शकते. चला तर मग जाणून घेऊया कोणत्या लोकांनी चिंच खाऊ नये.**

# या ४ लोकांनी चिंच खाऊ नये, आरोग्याची हानी होऊ शकते

**डायबिटीज :** डायबिटीजच्या रुग्णांनी चिंचेचे सेवन करू नये. विशेषतः जेव्हा तुम्ही कोणतेही औषध घेत असाल तेव्हा चिंचेचे सेवन टाळा.



**ॲलर्जी :** चिंच खाल्ल्याने अनेकांना ॲलर्जीची समस्या होऊ शकते. म्हणून जर आपल्याला चिंच खाल्ल्यावर त्वचेवर चट्टे किंवा खाज, तसेच उल्टी यासारख्या समस्यांना सामोरा जावे लागत असेल तर याचे सेवन लगेच बंद करा.

**दातांना नुकसान :** चिंचेत ॲसिडिक घटक आढळतात, याने दातांचा पृष्ठभाग खराब होतो. त्यामुळे चिंचेचे सेवन मर्यादित प्रमाणात करावे, जर तुम्हाला दातांची समस्या असेल तर चिंचेचे सेवन करू नका.

**गर्भवती महिला :** गर्भवती स्त्रियांना यादरम्यान आंबट वस्तू खाण्याची इच्छा होते, मात्र अधिक प्रमाणात चिंच खाल्ल्याने गर्भवती स्त्रियांना नुकसान होऊ शकते. अशात या गोष्टी खाण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

**अस्वीकरण :** ही सल्ला देणारी सामग्री केवळ सामान्य माहिती प्रदान करते. हे कोणत्याही प्रकारे पात्र वैद्यकीय मताचा पर्याय नाही. अधिक माहितीसाठी तज्ज्ञ किंवा तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# ब्लॉटिंगचा त्रास असल्यास हे करा...

**ब्लाटिंग म्हणजे पोट फुगणे. काही वेळेस ॲसिडिटीने पण पोट फुगत असते. काही गरिष्ठ खाण्यात आल्यानेही हा त्रास होतो. पण आज आपण या लेखात मासिक पाळीदरम्यान होणाऱ्या ब्लॉटिंगबद्दल जाणून घेऊ या. तसेच त्यावरील उपायदेखील जाणून घेऊ या. मासिकपाळीच्या काळात ॲसिडिटीमुळे पोटात दुखते पोट फुगण्याचा त्रास देखील होतो. त्यासाठीचे काही उपाय केल्यास त्या त्रासापासून आणि वेदनांपासून मुक्ती मिळते.**



- चमचमीत मसालेयुक्त पदार्थांचा वापर टाळावा यामुळे ॲसिडिटीचा त्रास होतो.
- पचनतंत्रामध्ये बिघाड होतो, त्यासाठी आपले पचनतंत्र सुरळीत करण्यासाठी आलं आणि लिंबाच्या चहाचे सेवन करावे.
- गवती चहा घ्यावा ॲसिडिटीचा त्रास कमी होतो.
- पाणी तर सर्व गोष्टींवर रामबाण उपाय आहे. जास्त पाणी पिणे उत्तम स्वास्थ्य असण्याची लक्षण आहे. पाण्यामुळेच सर्व आजार नाहीसे होतात. त्यामुळे जेवढे जमेल तेवढे पाणी पिणे फायदेशीर असतं.
- या काळात आपल्या शरीरास पौष्टिक तत्त्व पाहिजे असतात. कॅल्शियम आणि मॅग्नेशियम आहारयुक्त पदार्थांचं समावेश करणं फायदेशीर ठरतं. केळ आणि दुधात कॅल्शियम असतं. त्याचे सेवन करावे.
- या काळात अशा वस्तू ज्या गॅस वाढवतात आणि पोट फुगवतात ते खाणे टाळावे. सकस आहार घ्यावा. ब्रोकोली, कोबी, फ्लॉवरची भाजी खाऊ नये. त्यामुळे गॅसेस पण होते आणि ॲसिडिटीचा त्रास जास्त वाढण्याची शक्यता असते.
- आलं शरीरातील सूज कमी करण्यास फायदेशीर असतं. यामध्ये अँटी इन्फ्लेमेटरी आणि अँटी स्पॅस्मोडिकचे गुणधर्म असतात. शरीरातील वेदना दूर करण्याचे काम करतं.
- काही वेळा काही जण ॲसिडिटी आहे म्हणून शीतपेयाचे सेवन करतात. असे केल्याने ब्लॉटिंगचा त्रास अजून वाढतो.
- चहा जास्त घेऊ नका कारण ॲसिडिटी वाढण्यासाठी हे कारणीभूत आहे.
- व्यायाम आणि योगा करा. पण थकवा जाणवेल असे काही करू नका.
- पपई ही पचनतंत्र सुरळीत करण्याचे कार्य करते. यामधले असलेले पपॅन एंझाइम पचन संस्थेला सुरळीत ठेवण्याचे काम करते. पपई खाल्ल्याने ॲसिडिटी, गॅस, ब्लॉटिंगच्या त्रासापासून सुटका होते.
- मदिरासारखे अल्कोहोल घेत असल्यास त्वरित घेणे बंद करावे. यामुळे ॲसिडिटीचा त्रास कमी होण्याऐवजी जास्त वाढतो.

# तुम्ही नखं खाता का?

**या उद्भवतात समस्या–** नखातील मळ, घाण पोटात गेल्याने पोटदुखी आणि अपचन यासारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. काही जणांना नखांबरोबर त्याच्या बाजूची त्वचा खाण्याचीही सवय असते. यामुळे नखांना नखुर्डे होण्याची शक्यता असते.

**असा करा उपाय –** काही मोठ्या व्यक्तीना देखील नखे खाण्याची इच्छा होते. याचे निरीक्षण करावे, समजा एखाद्या गोष्टीचा ताण आल्यावर किंवा एखाद्या गोष्टीची भीती वाटल्यावर नखे कुरतडली जातात. मात्र, अशावेळी शांतपणे विचार करा. स्वतःबाबत कोणत्याही प्रकारचा कमीपणा वाटून घेऊ नका. अतिविश्वास बाळगायला शिका. समस्यांना घाबरून न जाता सामोरे जायला शिका. कोणत्याही गोष्टींची उत्सुकता असेल त्यावेळी मन शांत ठेवत हात तोंडाकडे जाऊ देऊ नका.



# वसई-विरारमध्ये वायू प्रदूषणाने धोक्याची पातळी ओलांडली

**■ बातमी /लेख,**
**विनोद दशगथ मेढे**

मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) वाढत चाललेल्या वायू प्रदूषणाने धोक्याची पातळी ओलांडली असताना वसई-विरार शहरात मात्र परिस्थिती अधिकच गंभीर होत चालली आहे. शहराचा वायू गुणवत्ता निदेर्शांक (एक्यूआय) 150 च्या पुढे गेला असतानाही वसई-विरार महापालिका प्रशासनाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याने नागरिकांच्या आरोग्याबाबत तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे. प्रदूषणामुळे श्वास घेणेही कठीण झाले असून, शहराचा अक्षरशः श्वास कोंडल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

मुंबईतील प्रदूषणाच्या मुद्दयावर उच्च न्यायालयाने अलीकडेच कडक भूमिका घेत पालिका प्रशासनाला धारेवर धरले होते. त्याच पार्श्वभूमीवर वसई-विरार महापालिकेच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शहरात सुरू असलेली मोठ्या प्रमाणावरील बांधकामे, रस्ते खोदकामे, जलवाहिनी प्रकल्प आणि अवजड वाहनांची बेशिस्त वाहतूक यामुळे हवेत धुळीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. मात्र या सर्वांवर नियंत्रण ठेवण्यात महापालिका अपयशी ठरत असल्याचा आरोप होत आहे.

### पर्यावरण विभाग केवळ नावापुरताच?

दरम्यान, पर्यावरण विभाग केवळ नावापुरताच असल्याचा आरोपही केला जात आहे. प्रदूषण मोजमापन केंद्रे बंद अवस्थेत असून नियमांचे उल्लंघन करणार्यांवर कारवाई होत नसल्याने प्रशासनावर टीका होत आहे. वाढत्या प्रदूषणामुळे दमा, खोकला, श्वसनाचे आजार वाढत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत.






बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी धूळ हवेत पसरू नये म्हणून 'ग्रीन नेट' लावणे, पाणी फवारणी करणे आवश्यक असताना अनेक विकासक हे नियम सर्रास धुडकवत आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, महापालिकेकडूनच करण्यात येर्णाया तोडकाम आणि खोदकामाच्या वेळीही संरक्षणात्मक उपाययोजना केल्या जात नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. "पालिका स्वतःच नियम पळत नसेल, तर खाजगी बांधकाम व्यवसायिकांकडून काय अपेक्षा करायची?" असा सवाल उपस्थित केला जात आहे.

प्रदूषण नियंत्रणासाठी महापालिकेने राष्ट्रीय हवा शुद्धीकरण उपक्रमांतर्गत कोट्यवधी रुपये खर्चून फॉग कॅनन वाहने खरेदी केली आहेत. सुमारे तीन कोटी रुपयांची ही यंत्रणा हवेत उडणारे धूलिकण कमी करण्यासाठी उपयुक्त ठरू शकते. मात्र प्रत्यक्षात ही वाहने शहरभर फिरताना क्वचितच दिसतात. अनेकदा ही यंत्रणा महापालिका मुख्यालयाच्या आवारातच उभी असल्याचे चित्र आहे. त्यामुळे वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण कसे आणणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

या पार्श्वभूमीवर एक समाजसेवकाने महापालिकेच्या हलगर्जीपणामुळे उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याची तयारी सुरू केल्याची माहिती आहे. त्यामुळे येत्या काळात वसई-विरार महापालिकेला न्यायालयीन प्रश्नांना सामोरे जावे लागण्याची शक्यता असून, प्रदूषणाच्या मुद्द्यावर प्रशासनाला अखेर जाग येणार का, असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

# महामार्गावर एआयचा पहारा
## अपघात टाळण्यासाठी चालकांना आधीच मिळणार इशारा

**■वसई। प्रतिनिधी,**

राज्यात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या रस्ते आपघातांच्या घटनांमुळे प्रशासन चिंतेत असून, या पार्श्वभूमीवर गृहविभागाने वाहतूक सुरक्षेसंदर्भात महत्वाचा निर्णय घेतला आहे. आपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि महामार्गावरील वाहतुकीत शिस्त आणण्यासाठी राज्यातील प्रमुख महामार्गांवर इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टिम (आयटीएमएस) टप्प्याटप्प्याने कार्यान्वित करण्यात येणार आहे. या प्रणालीत आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला जाणार आहे. या अत्याधुनिक योजने अंतर्गत राज्यातील ३६ जिल्ह्यांमधील सुमारे २१ हजार ४०० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांवर लक्ष ठेवले जाणार आहे. आपघातांची शक्यता अधिक असलेल्या तब्बल ८६९ ठिकाणी विशेष लक्ष केंद्रित केले जाईल. या ठिकाणी एआय-आधारित कॅमेरे आणि सेन्सर्स बसवून वाहतूक हालचालींवर सतत नजर ठेवली जाणार आहे. वेग, वाहनांची घनता आणि चालकांचे वर्तन याचे बारकाईने निरीक्षण केले जाणार आहे.

या प्रणालीतील महत्वाचा घटक म्हणजे 'ॲव्हरेज स्पीड डिटेक्शन सिस्टिम'. ठराविक अंतरावर वाहनाने घेतलेला सरासरी वेग मोजून वेगमयार्देचे उल्लंघन



करणाऱ्या वाहनचालकांची ओळख पटवली जाणार आहे. केवळ एका ठिकाणी वेग कमी करून पुढे वेग वाढवणाऱ्या चालकांवरही या प्रणालीमुळे नियंत्रण ठेवता येणार आहे. त्यामुळे बेदरकार वाहनचलकांवर प्रभावी कारवाई होणार आहे.

आयटीएमएस अंतर्गत वाहतूक नियम मोडणाऱ्या वाहनचालकांवर स्वयंचलित पद्धतीने चलान आकारले जाणार आहे. सुमारे 11 प्रकारच्या नियमभंगांची नोंद ही प्रणाली करणार असून, मानवी हस्तक्षेपाशिवाय दंडाची प्रक्रिया पूर्ण होणार आहे. लेन शिस्त न पाळणे, वेगमयार्दा ओलांडणे, सिग्नल तोडणे यांसारख्या चुकांवर तत्काळ कारवाई केली जाईल. या प्रणालीचे एक वैशिष्ट्य म्हणजे रिअल टाइम डेटा विश्लेषण. वाहतुकीची सद्यस्थिती, संभाव्य धोके आणि अपघाताची शक्यता यांचा तत्काळ अंदाज घेऊन प्रशासनाला वेळीच उपाययोजना करता येणार आहेत. काही प्रसंगी चालकांना अपघात होण्याआधीच इशारे दिले जाणार असून, त्यामुळे जीवितहानी टाळण्यास मदत होईल.

# ती भ्रूणहत्याच ठरेल...
## न्यायालयाने नाकारली गर्भपाताची परवानगी खर्च राज्यशासनाने करण्याचे आदेश




**■मुंबई।प्रतिनिधी,**

२७ आठवड्यांच्या गरोदर अल्पवयीन पीडित मुलीचा गर्भपात करण्यास मुंबई उच्च न्यायालयाने परवानगी नाकारली. अशा प्रकारे परवानगी दिल्यास ती भ्रूणहत्या ठरेल, असे स्पष्ट करत न्यायमूर्ती रवींद्र घुगे व न्यायमूर्ती अभय मंत्री यांच्या खंडपीठाने बाळ जन्माला आल्यानंतर पीडितेच्या आरोग्याची संपूर्ण काळजी व त्यासाठी येणारा खर्च राज्य शासनाने करावा, असा आदेश दिला.

लग्नाचे आमिष दाखवून या पीडितेवर अत्याचार करण्यात आला आहे. या प्रकरणातील पीडिता अल्पवयीन असून तिच्यावर अत्याचार करणारा आरोपीही अल्पवयीनच आहे. या प्रकरणी पीडितेच्या आईने पोलिसांत गुन्हा नोंदवला आहे. पीडिता २७ आठवड्यांची गरोदर असल्याने एमटीपी कायद्यानुसार २० आठवड्यांनंतर गर्भपात करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाची परवानगी बंधनकारक असल्याने तिच्या आईने मुलीचे भविष्य आणि तिच्या आरोग्याचा विचार करून या गर्भपातासाठी न्यायालयाचे दरवाजे ठोठावले होते.

**पीडितेची संपूर्ण काळजी घ्या!**

या याचिकेवर न्यायमूर्ती रवींद्र घुगे व न्यायमूर्ती अभय मंत्री यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली या प्रकरणी गर्भात बाळाची वाढ झालेली आहे. गर्भपाताच्या प्रक्रियेत जिवंत बाळ जन्माला येण्याची शक्यता आहे, असा वैद्यकीय अहवाल जे.जे. रुग्णालयातील डॉक्टरांनी पीडितेच्या तपासणीअंती न्यायालयात सादर केला. यांची दखल घेत खंडपीठाने गभार्तील बाळाची वाढ झालेली असल्यास, आणि त्याची वाढ सर्वसामान्य असल्यास गर्भपाताला कायद्याने परवानगी देता येत नाही, असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे. त्यामुळे या प्रकरणात पीडितेची गर्भपाताची मागणी मान्य करता येणार नाही, असे नमूद करत गर्भपाताची परवानगी मागत पीडितेच्या आईने दाखल केलेली याचिका नाकारली. मात्र तिच्या प्रसूतीनंतर पीडितेसाठी डॉक्टरची व्यवस्था करण्यात यावी तसेच पीडितेची संपूर्ण काळजी घ्यावी, असे आदेश हायकोटार्ने बाल कल्याण समितीला दिले आहेत.

### जे. जे.च्या अहवालाची गंभीर दखल

खंडपीठाने जे. जे. रुग्णालयाने सादर केलेल्या अहवालाची गंभीर दखल घेतली. गभार्तील बाळाची वाढ झाली आहे. गर्भपाताच्या प्रक्रियेत जिवंत बाळ जन्माला येण्याची शक्यता असल्याचे अहवालात स्पष्ट केल्याने गभार्तील बाळाची वाढ झाली असल्यास गर्भपाताला परवानगी देता येत नाही. असे स्पष्ट करत गर्भपाताला परवानगी देण्यास नकार दिला तसेच प्रसूतीनंतर पीडित मुलीबरोबरच नवजात गर्भाच्या देखभालीचा वैद्यकीय खर्च राज्य सरकारने करावा, तसेच बाल कल्याण समितीने सवोतीपरी काळजी घ्यावी, असे आदेशात स्पष्ट केले.

### गुरुत्वाकर्षण प्रणालीतून शुद्धीकरण केंद्रात

मुंबईला होणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या मुख्यतः दोन प्रणाली आहेत. त्यापैकी एका प्रणालीतून तानसा-वैतरणा प्रणालीद्वारे तानसा, मोडक सागर, मध्य वैतरणा आणि अप्पर वैतरणा या जलाशयांमधील पाणी जलवाहिन्यांच्या माध्यमातून गुरुत्वाकर्षणाद्वारे भांडुप संकुलात आणले जाते. भांडुप संकुलातील जुन्या व नवीन जलशुद्धीकरण केंद्रामध्ये या पाण्यावर शुद्धीकरण प्रक्रिया करण्यात येते. दररोज सुमारे २६०० दशलक्ष लिटर पाणी विविध ठिकाणी असलेल्या सेवा जलाशयांमार्फत मुंबईकरांपर्यंत पोहोचवण्यात येते. भांडुप संकुल येथील १९१० दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेच्या जलशुद्धीकरण प्रकल्पाचे बांधकाम सुमारे ४६ वर्षांपूर्वी करण्यात आले आहे.

### शुद्धीकरणाची क्षमता वाढणार

हा प्रकल्प संरचनात्मकदृष्ट्या कमकुवत झाल्याने २ हजार दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेचा नवीन जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात येत आहे. नवीन जलशुद्धीकरण प्रकल्पात दररोज २ हजार दशलक्ष लिटर पाण्यावर प्रक्रिया करण्यात येणार आहे.

### मुंबईला अधिक क्षमतेने पाणीपुरवठा

भांडुप संकुलातील ७.४ हेक्टर जागेवरील नवीन जलशुद्धीकरण प्रकल्प आशियातील सर्वात मोठ्या विद्यमान प्रकल्पाला पुनर्स्थित करेल. ज्यामुळे मुंबईला अधिक क्षमतेने पाणीपुरवठा होण्यास मदत होईल. पाण्याची वाढती गरज भागवणे आणि आयुर्मान संपलेल्या जुन्या प्रकल्पाची जागा घेणे, हे प्रमुख उद्दिष्ट आहे.

### कामे जलद गतीने सुरू

सद्यस्थितीत माती परीक्षण, खोदकाम, प्रकल्पस्थळास बॅरिकेडिंग, वीजवाहक तारांच्या मनोऱ्यांचे स्थलांतरण, वृक्षारोपण इत्यादी कामांना वेग मिळाला आहे. स्थापत्य कामांसह यांत्रिकी, विद्युत व उपकरणीय कामे ही समांतरपणे सुरू करण्यात आली आहेत. पावसाळ्यापूर्वी अधिकाधिक कामे करण्यावर भर देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, असे गगराणी यांनी नमूद केले.

# मुंबईकरांना मिळणार शुद्ध पाणी
## भांडुप संकुलात २००० दशलक्ष लिटर क्षमतेचा जलशुद्धीकरण प्रकल्प



**■मुंबई। प्रतिनिधी,**

भविष्यातील वाढती लोकसंख्या वाढत्या पिण्याच्या पाण्याची वाढती गरज लक्षात घेता भांडुप संकुलातील २ हजार दशलक्ष लिटर क्षमतेचा जलशुद्धीकरण प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. त्यामुळे जलशुद्धीकरण प्रकल्प उभारणीच्या कामांना गती देण्यात यावी तसेच प्रकल्पाच्या अंमलबजावणी दरम्यान आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून कार्यक्षम, पर्यावरणपूरक व दीर्घकालीन शाश्वत पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यावर विशेष भर देण्यात यावा, असे निर्देश महापालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिले आहेत.

भांडुप संकुल येथे महानगरपालिकेमार्फत २ हजार दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेचा अत्याधुनिक जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात येत आहे. एप्रिल २०२९ पर्यत जलशुद्धीकरण प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. महापालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी शुक्रवारी या जलशुद्धीकरण प्रकल्पाला भेट देऊन पाहणी करत प्रगतीचा आढावा घेतला. उपायुक्त (विशेष अभियांत्रिकी) पुरुषोत्तम माळवदे, प्रमुख अभियंता महेंद्र उबाळे यांच्यासह संबंधित अभियंते, अधिकारी यावेळी उपस्थित होते.

# हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्च अखेरीस सुरू



**■मुंबई। प्रतिनिधी,**

हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो प्रवास लवकरच मार्च अखेरीस सुरू होण्याची शक्यता आहे. मेट्रो प्रकल्पाने यापूर्वी दोन महत्वाच्या ट्रायल रन यशस्वीरित्या पार केले आहेत. सध्या हिंजवडीझ शिवाजीनगर दरम्यान प्रवास साधारण दोन तास लागतो; मेट्रो सुरू झाल्यानंतर हा प्रवास फक्त ३० मिनिटांत होईल. प्रकल्पाची वैशिष्ट्येः डबल-डेकर पुलः युनिव्हर्सिटी चौकात तयार करण्यात आलेल्या या पुलावर खाली रस्ता, त्यावर फलक आणि वरच्या स्तरावर मेट्रो मार्ग आहे. या नवोन्मेषी रचनेमुळे शहरातील गस्त जंक्शनवरील वाहतूक सुरळीत होणार आहे. सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) मॉडेलः देशातील पहिला मेट्रो प्रकल्प ज्यात हा मॉडेल वापरण्यात आला आहे. खर्चः अंदाजे ८ हजार ३१३ कोटी; केंद्र व राज्य सरकार यांच्याकडून आर्थिक मदत. फायदेः वेळेची बचतः दोन तासांचा प्रवास फक्त ३० मिनिटांमध्ये कमी पर्यावरणपूरक वाहतूकः प्रदूषण कमी व अपघातांची शक्यता कमी कनेक्टिव्हिटी सुधारणाः हिंजवडीझशिवाजीनगर थेट जोड, औद्योगिक व आर्थिक वाढीस चालना मेट्रोची माहितीः लांबीः २३.२० किलोमीटर स्थानकेः २३ ट्रेनसेट्सः १४ तांत्रिक तपासणी व सुरक्षा चाचण्या पूर्ण हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कमध्ये ८०० हून अधिक कंपन्या असून २.२ लाख कर्मचाऱ्यांचा दैनंदिन प्रवास या मेट्रोमुळे सोपा होईल. हिंजवडी मेट्रोच्या सुरू होण्याने पुण्यातील वाहतूक आणि शहरी मोबिलिटीमध्ये मोठा बदल अपेक्षित आहे.

# बारा वर्षांत एकही नवीन साधी लोकल नाही
## वाढत्या प्रवासी संख्येमुळे सुरक्षेचा प्रश्न गंभीर

**■बदलापूर। प्रतिनिधी,**

कल्याणपलीकडील उपनगरी रेल्वे सेवेत मागील बारा वर्षांत एकही नवीन साधी लोकल सुरू झालेली नसल्याने बदलापूर, अंबरनाथ, वांगणी या वाढत्या लोकसंख्या असलेल्या पट्टयात प्रवाशांवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. वाढती गर्दी, मर्यादित गाड्या आणि अपुऱ्या सुविधांमुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्नही गंभीर बनत चालला आहे.

गेल्या दोन दशकांत या भागातील नागरीकरण वेगाने वाढले आहे. हजारो नागरिक रोज बदलापूर-कल्याण-ठाणे-मुंबई असा लोकलने प्रवास करतात. मात्र गाड्यांची संख्या वाढलेली नसल्याने प्रत्येक लोकल अक्षरशः खचाखच भरलेली असते. सकाळ-संध्याकाळच्या गर्दीच्या वेळेत तर प्लॅटफॉर्मवर आणि डब्यांच्या दरवाज्यांवर जीव धोक्यात घालून प्रवास करणाऱ्यांचे प्रमाण वाढल्याचे चित्र आहे.

प्रवासी संघटना आणि स्थानिक नागरिकांकडून वारंवार लोकल गाड्यांची संख्या वाढवणे, विद्यमान गाड्यांना अधिक डबे जोडणे, तसेच महिला विशेष लोकल सुरू करण्याच्या मागण्या केल्या जात आहेत. मात्र त्याकडे अपेक्षित गांभीयार्ने लक्ष दिले जात नसल्याची खंत व्यक्त होत आहे. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी रेल्वे प्रशासनाने तातडीने पावले उचलण्याची गरज व्यक्त केली जात आहे. अन्यथा गदीर्मुळे अपघातांची शक्यता वाढत राहील, अशी भीतीही प्रवासी संघटनांकडून व्यक्त होत आहे.

# शीव पूल १५ जुलैपर्यंत वाहतुकीसाठी खुला होणार
## अतिरिक्त पालिका आयुक्तांनी केली पाहणी

**■मुंबई। प्रतिनिधी,**

पूर्व व पश्चिमेला जोडणारा सायन उड्डाणपूल कामाला गती मिळाली आहे. पादचाऱ्यांना पूर्व-पश्चिमेला ये-जा करण्यासाठी पादचारी पूल कार्यान्वित करण्यात आला आहे. दोन भुयारी पादचारी मार्गांपैकी एक भुयारी पादचारी मार्ग पूर्ण झाला आहे. येत्या पंधरवड्यात तो कार्यान्वित करण्यात येईल. याच पद्धतीने महापालिका आणि रेल्वे प्रशासनामार्फत केली जाणारी कामे अधिकाधिक समांतर पद्धतीने करावीत, असे निर्देश अतिरिक्त पालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत. १५ जुलैपर्यंत शीव उड्डाणपुलाची सर्व कामे पूर्ण होऊन वाहतुकीसाठी खुला केला जाईल, असे बांगर यांनी स्पष्ट केले.

शीव पुलाचे रेल्वे हद्दीतील काम रेल्वे विभाग आणि पोहोच मार्ग, दोन पादचारी भुयारी मार्ग आदींचे काम महापालिका करत आहे. लाल बहादूर शास्त्री मार्गावरील भुयारी मागार्चे काम पूर्ण झाले आहे. अभियंते, अधिकारी यांनी दररोज कार्यस्थळी उपस्थित राहावे, असे निर्देश बांगर यांनी यावेळी दिले. यावेळी पालिकेचे प्रमुख अभियंता उत्तम श्रोते, उपप्रमुख अभियंता राजेश मुळ्ये, मध्य रेल्वेचे



उपमुख्य अभियंता रोहित मेहला यांच्यासह अभियंते उपस्थित होते.

**चारही टप्प्यांसाठी सूक्ष्म नियोजन**

पश्चिमेकडील कामाचे ४ टप्पे असून या चारही टप्प्यांच्या पूर्णत्वाचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले तसेच त्यांची कालमयार्दा निश्चित करण्यात आली. एकंदरीतच, पश्चिम बाजूची सर्व कामे ३१ मे २०२६ पर्यंत पूर्ण केली जातील. रेल्वे प्रशासनाकडून ३१ मे २०२६ पर्यंत पूर्व बाजूचा पोहोच रस्त्याचा ताबा महापालिकेला मिळणे अपेक्षित असल्याने उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी त्यानंतर आणखी काही कालावधी आवश्यक आहे. त्याचा विचार करता या पुलाची सर्व कामे १५ जुलैपर्यंत पूर्ण केली जातील व पूल वाहतुकीला खुला केला जाईल, असे बांगर यांनी नमूद केले.

### घटनास्थळी मोठी गर्दी

सूटकेसमध्ये मृतदेह असल्याची बातमी काही वेळातच परिसरात वाऱ्यासारखी पसरली. घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी जमली. वेगवेगळ्या चर्चा सुरू झाल्या असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. माहिती मिळताच डेहरी नगर पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी ट्रॉली बॅग उघडून पाहिली असता त्यात एका युवतीचा मृतदेह आढळून आला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता पोलिसांनी तातडीने कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात केला.

## 'तुमची मुलगी पळून गेली...' जावयाचा फोन आल्याने माहेरची लोकं चिंतेत
# दुसऱ्या दिवशी समोर आलेल्या बातमीने सगळेच हादरले

**■मुंबई। प्रतिनिधी,**

बिहारमधील रोहतास जिल्ह्यातून एक धक्कादायक आणि हृदय पिळवटून टाकणारी घटना समोर आली आहे. 'तुमची मुलगी पळून गेली आहे' असा फोन जावयाने रात्री उशिरा सासरच्या मंडळींना केला. मुलगी कुठेतरी गेली असून लवकरच घरी परत येईल, या आशेवर कुटुंबीय वाट पाहत होते. मात्र दुसऱ्याच दिवशी समोर आलेल्या बातमीने सर्वांनाच हादरवून सोडले. युवतीचा मृतदेह लाल रंगाच्या ट्रॉली बॅगमध्ये भरून भाजी मंडईत फेकून देण्यात आल्याचे उघड झाले.

ही घटना रोहतास जिल्ह्यातील डेहरी नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत, रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या भाजी मंडीजवळ घडली. रविवारी सकाळी सुमारे नऊच्या सुमारास स्थानिक



नागरिकांच्या निदर्शनास एक संशयास्पद अवस्थेतील ट्रॉली बॅग पडलेली दिसली. बॅगमधून तीव्र दुर्गंधी येत असल्याने नागरिकांना अनिष्ट घडल्याची शंका आली आणि त्यांनी तातडीने डेहरी नगर पोलीस ठाण्याला माहिती दिली.

पोलिसांनी त्वरित कारवाई करत मृतदेह ताब्यात घेतला आणि सासाराम येथील सदर रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवला. मृत महिलेची ओळख पटवण्याचे कामही सुरू करण्यात आले आहे. घटनास्थळी व्हिडीओग्राफी आणि फोटोग्राफी करण्यात आली असून कोणतेही पुरावे नष्ट होऊ नयेत याची काळजी घेण्यात येत आहे. फॉरेन्सिक सायन्स लॅब (एफएसएल) पथकानेही घटनास्थळी भेट देत आवश्यक नमुने गोळा केले आहेत.

या प्रकरणाबाबत रोहतासचे पोलीस अधीक्षक रौशन कुमार यांनी सांगितले की, मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून पोस्टमार्टम अहवाल आणि एफएसएलच्या अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल. सध्या पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले जात असून ट्रॉली बॅग नेमकी केव्हा आणि कोणी घटनास्थळी आणून ठेवली, याचा शोध घेतला जात आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून पुढील तपासाकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

# आठवीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीने बाळाला दिला जन्म

**■कल्याण।प्रतिनिधी,**

एका वसतीगृहात साडेतेरा वर्षांच्या विद्यार्थिनीने लहान बाळाला जन्म दिला. या घटनेनं विद्यार्थिनीच्या सुरक्षेवर आणि निवासी वसतिगृहांच्या व्यवस्थापनेवर प्रश्न उपस्थित होत आहे. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलीस प्रशासनाने कठोर कारवाई करत वसतिगृहात अधीक्षकाला निलंबित केलं. संबंधित प्रकरणात पोलिसांनी आरोपी तरुणाला अटक केली. ही घटना मध्य प्रदेशातील बालाघाट येथील आहे.

**आठवीमध्ये शिक्षण घेणारी विद्याथीर्नी प्रेग्नंट**

घडलेल्या घटनेनुसार, परसमऊ कस्तुरबा गांधी हे वसतिगृह जिल्हा शिक्षण केंद्राच्या अंतर्गत चालवले जाते. या वसतिगृहात इयत्ता ८ वी मध्ये शिक्षण घेणारी विद्याथीर्नी प्रेग्नंट राहिली होती. या घटनेनं परिसर हादरून गेला आहे. या प्रकरणी आदिवासी व्यवहार विभागाच्या सहाय्यक आयुक्तांनी परसमऊ येथील कस्तुरबा गांधी कन्या वसतिगृहाच्या अधीक्षक श्रीमती चैनाबती सयाम यांना तात्काळपणे निलंबित केले होते. संबंधित प्रकरणाचा तपास केला असता, अधीक्षकांनी विद्यार्थिनीच्या शारीरिक आरोग्याबाबत आणि वर्तनाबाबत कोणतीही संवेदनशीलता दाखवली नाही. विद्याथीर्नी वसतिगृहात वारंवार अनुपस्थित दर्शवत होती असं वृत्त आहे.

**तिचे बाळ दोघेही निरोगी**

या प्रकरणात पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत गुन्हा दाखल करून तपास सुरु केला. पीडितेनं जबाबाच्या आधारे गावातील तरुणाला अटक केली. पीडित मुलीचं वय 13.5 असल्याची पुष्टी करण्यात आली होती. दरम्यान, पीडित मुलगी आणि तिचे बाळ दोघेही निरोगी आहेत. त्यांना काळजीसाठी ट्रॉमा सेंटरमध्ये दाखल करण्यात आले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com